# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २१, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(३)** | **गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५१**

---

## पुणे येथील ससून रुग्णालयाच्या गेटवरुन कोट्यवधी रुपयांचे अंमली पदार्थ पोलिसांनी जप्त केल्याबाबत

**(१) * २१८१४ श्री.महादेव जानकर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कैद्याकडून अंमली पदार्थ तस्करीचे रॅकेट चालविले जात असल्याचा प्रकार गुन्हे शाखेने उघडकीस आणला असून, ससून रुग्णालयाच्या गेटवरुन रुपये २ कोटी १४ लाखांचे "मेफेड्रॉन" हा अंमली पदार्थ पोलिसांनी जप्त केल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांच्या निगराणीखाली असलेला अंमली पदार्थाच्या तस्करीचा सुत्रधार ललित पाटील अनेक महिन्यांपासून ससून रुग्णालयात उपचार घेत असून, सदरहू तस्करीत रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी व पोलीस अधिकारी यांचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ललित पाटील हा कोणत्या व्याधींनी त्रस्त असून त्यांच्यावर कोणत्या स्वरुपाची मोठी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे काय, या प्रकरणाबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारची माहिती देऊ नका अशा स्वरुपाची धमकी ससूनचे अधिष्ठाता यांनी तेथील डॉक्टरांना व कर्मचाऱ्यांना दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, येरवडा जेलमधील कैदी ललित पाटील यास कोणताही आजार नसताना ससून रुग्णालयामध्ये दाखल करण्यासाठी राजकीय व्यक्तींकडून डॉक्टरांवर दबाव येत असून सदरहू कैदी ललित पाटील यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास ससून रुग्णालयातून पलायन केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंमली पदार्थ तस्करीचा मुख्य सुत्रधार व या तस्करीत सहभागी असणाऱ्या रुग्णालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर बाबतीत बंड गार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे एन.डी.पी.एस. अधिनियम 1985 चे कलम 8(सी), 22(सी),29 व भा.द.वि.कलम 201 अन्वये दाखल गु.र.नं. 306/2023 च्या तपासात ससुन रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी व पोलिस अधिकारी यांचा अंमली पदार्थ तस्करीत सहभाग असल्याचे अद्याप पर्यंत निष्पन्न झालेले नाही. आरोपीच्या संरक्षण कामी नेमलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी कर्तव्यात हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्याने दोन पोलीस अधिकारी व दोन कर्मचारी यांना बडतर्फ केले असुन सहा कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कारवाई सुरु केली आहे.
(३) ललित पाटील हा Pulmonary T.B. Morbid Obesity with Incisional Hernia या व्याधिने ग्रस्त होता.त्याच्यावर मोठी शस्त्रक्रिया करण्यात आलेली नाही. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारची माहिती देऊ नका अशा स्वरुपाची धमकी ससूनचे अधिष्ठाता यांनी तेथील डॉक्टरांना व कर्मचाऱ्यांना दिल्याची लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) येरवडा जेलमधील कैदी ललित पाटील यास ससून रुग्णालयामध्ये दाखल करण्यासाठी राजकीय व्यक्तींकडून डॉक्टरांवर दबाव येत असल्याची कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही. कैदी ललित पाटील याने दि.02.10.2023 रोजी ससून रुग्णालयातून पलायन केले होते.
(५) होय, बंड गार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे दि.01.10.2023 रोजी गु.र.नं. 306/2023 एन.डी.पी.एस. अधिनियम 1985 चे कलम 8(सी), 22(सी), 29 व भा.द.वि. कलम क्र.201, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा 1999 चे कलम क्र. 3(1)( ii ), 3(2), 3(4), 3(5) व 4 प्रमाणे व बंड गार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे दि. 03.10.2023 रोजी गु.र.नं. 308/2023 भा.द.वि.कलम 223,224,225,120(ब)34 गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीच्या अहवालानुसार व आयुक्त वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांच्या अभिप्रायानुसार सदरची घटना गंभीर स्वरुपाची असल्यामुळे व तपासात अडथळा न होण्याच्या दृष्टिने अधिष्ठाता यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. तसेच पथक प्रमुख, अस्थिव्यंगोपचारशास्त्र यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. अधिष्ठाता, पथक प्रमुख, अस्थिव्यंगोपचारशास्त्र तसेच इतर विभागातील संबधितांविरुद्ध म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम 1979 च्या नियम 8 नुसार विभागीय चौकशीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांची फसवणूक केलेल्यांवर गुन्हा नोंद असूनही कारवाई होत नसल्याबाबत

**(२) * २१६३४ श्री.आमश्या पाडवी, ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यामध्ये सरदार सरोवर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या ५१ शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध होण्यासाठी त्यांच्याकडून रोखीने पैसे घेऊन त्यांना कोणतेही साहित्य न देता त्यांची फसवणूक केल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही न्याय मिळत नसल्यामुळे सदर शेतकऱ्यांकडून अक्कलकुवा, जि.नंदुरबार येथे रास्ता रोको आंदोलन केल्याचे दिनांक २७ सप्टेबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व आंदोलनकर्त्यांना प्रशासनामार्फत सदर फसवणूक प्रकरणी तक्रार नोंदविण्यात येऊन पुढील कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिल्यानंतर दिनांक २८ सप्टेंबर, २०२३ रोजी ३ व्यक्तींविरुध्द भा.द.वि. ४२०, ४०९, ३४ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त व्यक्तींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला असतानाही त्यांना अटक करुन त्यांच्यावर कोणतीच कारवाई न करता उक्त गुन्ह्यातील आरोपींना आरोग्य शिबिर भरविण्यासाठी परवानगी देऊन स्थानिक पोलीस अधिकारी पाठिशी घालत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपींना अटक करुन त्यांना पाठिशी घालणाऱ्या पोलिसांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.गृहमंत्री, मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार अक्कलकुवा पोलीस ठाणे गु.र.नं.४९८/२०२३ भादंवि कलम ४२०, ४०९, ३४ प्रमाणे ५ व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(३) हे खरे नाही. सदरहू गुन्ह्यातील पाचही आरोपींना मा.न्यायालयाकडून अटकपूर्व जामिन मंजूर झाला आहे. तसेच सदर दाखल गुन्ह्यातील आरोपींनी गुन्हा दाखल झाल्यानंतर अक्कलकुवा पोलीस ठाणे हद्दीत कोणतेही आरोग्य शिबिर भरविल्याचे निदर्शनास आलेले नाही व त्यांना अशा प्रकारची परवानगी देखील देण्यात आलेली नाही.
(४) व (५) सदर प्रकरणा संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीचे दिनांक ११/१०/२०२३ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले असून ते पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पोलीस अधीक्षक, नंदुरबार कार्यालयास पाठविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सारथी संस्थेच्या माध्यमातून मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळण्याबाबत

**(३) * २२२३७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा

करतील काय :-

(१) मराठा समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी सारथी संस्थेची उभारणी केली असून सन २०२२-२३ या वर्षात राज्य शासनाने मंजूर केलेल्या ३०० कोटी निधीपैकी केवळ ४४ कोटी रुपये खर्च झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधेबरोबर शहरात निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी यादृष्टीने पंजाबराव देशमुख निवास योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह सुरु करण्याचा निर्णय घेतला असूनही बहुतांश जिल्ह्यात वसतिगृहे अद्यापही सुरु झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सारथी संस्थेसाठी मंजूर केलेला निधी अखर्चित होण्याची कारणे काय आहेत तसेच सारथी संस्थेच्या माध्यमातुन मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे (सारथी) या संस्थेने उपलब्ध निधीपैकी रुपये १३०.८३ कोटी खर्च केले आहेत, तसेच सन २०२३-२४ मध्ये ऑक्टोबर, २०२३ अखेर रुपये ११८.५२ कोटी इतका खर्च झाला आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ९ नोव्हेंबर, २०२३ अन्वये "छत्रपती शिवाजी महाराज सारथी जिल्हास्तरीय वसतिगृहे संकुल योजना अंतर्गत खाजगी नोंदणीकृत संस्थांचे वसतिगृह चालविण्यास तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेशी संलग्नीत करुन सदर योजना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अंमलात आणण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार खाजगी वसतिगृहे सुरु करणेसाठी इच्छुक नोंदणीकृत संस्थेची निवड करणेची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समिती कडून करण्यात येत आहे.

(३) सारथी संस्थेमध्ये स्पर्धा परीक्षा, संशोधन, शिक्षण, कौशल्य विकास, कृषी, सामाजिक न्याय, सांख्यिकी असे विभाग कार्यन्वित असून सन २०२२-२३ या वर्षामध्ये स्पर्धा परीक्षा विभागाच्या UPSC, MPSC करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, संशोधन विभागातील Ph.D., एमफील करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, तसेच शिक्षण विभागाकडील छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती इतक्या योजना कार्यन्वित होत्या. सदर योजनांवर ऑक्टोबर, २०२३ अखेर सुमारे १३०.८३ कोटी इतका खर्च झालेला आहे. सन २०२३-२४ आर्थिक वर्षात स्पर्धा परीक्षा अंतर्गत UPSC, NET, SET, IBPS करीता आर्थिक सहाय्य, संशोधन विभागाच्या Ph.D. एमफील करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, कौशल्य विकास विभागाच्या IGTR, MKCL, MSSDS या संचलित कार्यन्वित उपक्रमांना आर्थिक सहाय्य, कृषी विभागाच्या IFAT, WBAT, या कोर्सेस करीता आर्थिक सहाय्य, शिक्षण विभागाच्या राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती, निबंधस्पर्धा तसेच सामाजिक न्याय विभागाच्या डॉ.पंजाबराव देशमुख देशांतर्गत शिष्यवृत्ती तसेच परदेशी शिष्यवृत्ती अशा मोठ्या प्रमाणावर योजना कार्यन्वित करण्यात आलेल्या आहेत. यामुळे मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना या योजनांतून चालु आर्थिक वर्षात खर्च करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील तुकाई उपसा सिंचन योजना पूर्ण करण्याबाबत

**(४) * २१९८५ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.निलय नाईक, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील तुकाई उपसा सिंचन योजनेसाठी चिंचोली फाटा येथे पाण्यासाठी १७ गावातील शेतकऱ्यांसह सर्वपक्षीय प्रतिनिधींनी रास्ता रोको आंदोलन केले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुकाई उपसा सिंचन योजना गत अनेक वर्षांपासून अपूर्णावस्थेत असून ती पूर्ण करण्याची मागणी या आंदोलनकर्त्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) तुकाई उपसा सिंचन योजनेच्या वितरण प्रणालीच्या कामासाठी वन्यजीव विभाग व वनविभाग यांचेकडून परवानगी न मिळाल्याने संबंधित क्षेत्रात वितरण प्रणालीचे काम करता आले नाही. जानेवारी २०२३ मध्ये वन्यजीव विभाग व वनविभाग यांचेकडून परवानगी प्राप्त झाल्याने वितरण प्रणालीचे काम सुरु करण्यात आले आहे.

तुकाई उपसा सिंचन योजनेच्या प्रस्तावित पंप हाऊसच्या कामासाठी आवश्यक असणारी जमीन देण्यास स्थानिक लाभधारक शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविल्याने सदर भूसंपादनासाठी तत्कालीन कार्यरत अभियंता यांनी प्रस्तावित केलेले खाजगी वाटाघाटीचे प्रस्ताव रद्द करून नव्याने नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ च्या कायद्याने पुन:श्च नवीन प्रस्ताव तयार करून स्थानिक लाभधारक शेतकऱ्यांची जमीन भूसंपादन झाल्याने अंतिम निवाडा जाहीर करून संपादन करण्यात आले आहे. तद्नंतर दिनांक २७/१०/२०२३ रोजी जागा ताब्यात आल्यानंतर सदर जागेवर पंप हाऊससाठी प्रत्यक्ष खोदकाम सुरु करण्यात आले आहे.

वन्यजीव विभाग व वनविभाग यांचेकडून परवानगी प्राप्त झाल्याने वितरण प्रणालीचे काम सुरु करण्यात आले आहे.

उर्ध्वनलिका कामासाठी पंप हाऊससाठी आवश्यक ते भूसपादन दिनांक २७/१०/२०२३ मिळाल्याने उर्ध्वगामी नलिकेचे काम प्रगतीपथावर आहे.

तुकाई उपसा सिंचन योजना, शिंदे शिवार, ता.कर्जत, जि.अहमदनगर या योजनेच्या १३२/३३ के, व्ही. Bay Foundation व Switch Yard च्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाळुज (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील औद्योगिक वसाहतीत वाढीव उपकेद्रांची उभारणी करणेबाबत

**(५) * २१२४६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळुज (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील महानगर औद्योगिक वसाहतीमध्ये किमान २०० मोठे उद्योग आणि ४००० मध्यम व लहान उद्योग असून त्यासाठी किमान २५ उपकेद्रांची आवश्यकता असूनही सध्या फक्त ७ उपकेंद्र कार्यरत असल्याने वीज खंडीत होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज खंडीत झाल्यामुळे गट नंबर मधील उद्योगांनी किमान ४५० के.व्ही.ए.च्या डी.पी.ची मागणी केली असता फक्त २०० के.व्ही.ए. क्षमतेचे डी.पी. कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाळुज परिसरातील वाढत्या उद्योगांसाठी महावितरणाकडून वाढीव लोड मंजूर केला जात नसल्याने लघू उद्योगांच्या उत्पादन क्षमतेमध्ये घट होऊन लघू उद्योजकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त उद्योगांना आवश्यक असलेला वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अशंत:खरे आहे.

महावितरण कंपनीच्या छत्रपती संभाजीनगर ग्रामीण विभागामध्ये वाळुज औद्योगिक वसाहत कार्यरत आहे. सदर औद्योगिक वसाहतीमध्ये ९५० लघुदाब व २० उच्चदाब वीज ग्राहक आहेत. सदर ग्राहकांना ३३ के.व्ही. करोडी उपकेंद्र, वाळुज महानगर उपकेंद्र व वाळुज गाव उपकेंद्रातून विद्युत पुरवठा करण्यात येतो. सदरील सर्व उपकेंद्राअंतर्गत येणारा परिसर हा छत्रपती संभाजीनगर शहराजवळचा असल्यामुळे येथे औद्योगिक, घरगुती व वाणिज्यीक विद्युत ग्राहक संख्या अत्यंत वेगाने वाढत असल्याने वीज खंडीत होण्याचे प्रमाण वाढत आहे.
(२) हे खरे नाही.

सदर औद्योगिक वसाहतीमध्ये वीज ग्राहकांना त्यांनी मागणी केल्यानुसारच विद्युत रोहित्र मंजूर केले जाते. सदर परिसरात ग्राहकांच्या मागणीपेक्षा कमी क्षमतेचे रोहित्र बसविण्यात आलेले नाही तसेच रोहित्राच्या विद्युत क्षमतेपेक्षा जास्त विद्युत भार त्यावर देण्यात आलेला नाही.
(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत महावितरण कंपनीच्या वाळुज शाखेअंतर्गत तसेच ग्रामीण उप विभाग क्र. १ मध्ये उद्योगांसाठीचे वाढीव लोडचे अर्ज प्रलंबित नाहीत. याबाबत ग्राहकांनी मागणी केल्यास तांत्रिक बाबी तपासून भार वाढविण्याबाबत महावितरण कंपनीमार्फत कार्यवाही करण्यात येते.
(४) महावितरण कंपनीमार्फत ३३/११ के.व्ही. वाळुज उप केंद्रातील भविष्यातील वीजेची मागणी विचारात घेता सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण (RDSS) योजनेंतर्गत अतिरिक्त ५ MVA चे रोहित्र प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच, ३३ के.व्ही. करोडी व वाळुज महानगर येथील दोन्ही पॉवर ट्रान्सफार्मरची क्षमता वाढ सुध्दा प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

याव्यतिरिक्त, साजापुर, करोडी, घाणेगांव व वडगांव कोल्हाटी येथील गट नंबर मध्ये असलेल्या औद्योगिक ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठा करण्याकरीता सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण (RDSS) योजनेंतर्गत तीसगांव व साजापुर येथे ३३/११ के. व्ही. नवीन उपकेंद्रे प्रस्तावित

करण्यात आली आहे. या औद्योगिक वसाहतीमध्ये औद्योगिक, घरगुती व वाणिज्यक विद्युत ग्राहक संख्या अत्यंत वेगाने वाढत असल्याने भविष्यातील विद्युत भार विचारात घेता १०० के.व्ही.ए. व २०० के.व्ही.ए. क्षमतेच्या २२७ रोहित्रांची क्षमता वाढ व नवीन १८३ रोहित्रे सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली (RDSS) सक्षमीकरण योजनेमध्ये प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकण किनारपट्टीवरील सुरक्षा यंत्रणा सक्षम बनविण्याबाबत

**(६) * २१६८७ श्री.जयंत पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणाला ७२० किलोमीटरचा सागरी किनारा लाभला असून सदर किनारा कायम सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील म्हणून ओळखला जात असूनही रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्याच्या समुद्रकिनारी १३ दिवसांत १३ कोटींचे अंमली पदार्थ सापडल्याची तसेच वेगवेगळ्या समुद्रकिनारी दिनांक २७ ते ३१ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत २०९.१३२ किलो ग्रॅमची ८ कोटी ३६ लाख ५२ हजार ८०० रुपये किंमतीची १७५ अंमली पदार्थांची पाकिटे आढळून आली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन मधील शेखाडी येथे १९९३ च्या मुंबईतील बॉम्बस्फोटांसाठी लागणारी स्फोटके पुरविण्यात आली होती, तसेच मुंबईवरील दिनांक २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यावेळी हल्लेखोरांनी सागरी मार्गाचा अवलंब केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, देशातील मोठ्या बंदरांपैकी जेएनपीटी बंदर हे रायगड जिल्ह्यात येत असून तेथे देश-विदेशातील मालाची वाहतूक होत असल्याने गत वर्षामध्ये तस्करीच्या प्रमाणात वाढ झाली असून त्यामध्ये शेकडो कोटींचे हेरॉइन, कोकेन हे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून रक्तचंदन, प्राण्यांचे अवयव, परदेशी सिगारेट, चिनी बनावटींचे ड्रोन, सोने, दुर्मिळ चित्रे आदी मौल्यवान वस्तुंचीदेखील तस्करी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सुरक्षा यंत्रणांमधील अनेक त्रुटींचा सखोल अभ्यास करण्यासाठी सागरी पोलीस तटरक्षक आणि नौसेना कस्टम यांच्यातील समन्वय वाढविणेबाबत तसेच सागरी सुरक्षा सक्षम करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) रत्नागिरी जिल्ह्यात दिनांक १४/०८/२०२३ ते दिनांक २८/०८/२०२३ या कालावधीत दापोली, व गुहागर पोलीस ठाणे हद्दीच्या समुद्र किनारी वेगवेगळ्या दिवशी एकूण ८७.९७७ कि.ग्रॅम वजनाचे चरस (हशिश) असलेली एकूण ७४ पाकीटे मिळुन आली असून त्याची किंमत सुमारे रु ३,५१,९०,८००/- आहे. याबाबत दापोली पोलीस ठाणे येथे दिनांक १५/०८/२०२३ रोजी गु.र.नं.

१३१/२०२३ गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परीणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २० (ब), (२), २२ (क) अन्वये दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

रायगड जिल्ह्याच्या वेगवेगळया समुद्रकिनारी २२८.६०१ किलो ग्रॅमची तब्बल ९ कोटी १४ लाख ४० हजार ४०० रुपये किंमतीची १९० अंमली पदार्थाची पाकीटे दि २७ ऑगस्ट ते ०१ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत आढळुन आली आहेत.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) उरण येथील जेएनपीटी बंदरातून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेने कारवाई करुन त्याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाणे गु.र.क्र. १६०/२०२२, कलम ८(सी), २२(सी), २३(सी), २९ एन.डी.पी.एस. कायदान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अटक आरोपींविरुध्द मा.विशेष न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, पनवेल, जि.रायगड येथे स्पेशल एनडीपीएस केस क्र.०३/२०२३ अन्वये दिनांक १६/०१/२०२३ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यातील पुढील तपास चालू आहे.

सागरी सुरक्षा सक्षम करण्याबाबत शासन खालीलप्रमाणे उपाय योजना करते.

पोलीस विभाग, तटरक्षक दल, नौसेना, कस्टम विभाग यांचा आपआपसातील समन्वय वाढविण्यासाठी जिल्हास्तरीय सागरी सुरक्षा समन्वय समितीची मासिक सभा आयोजीत केली जाते.

समुद्रात सुरक्षा यंत्रणाच्या सदस्यांची संयुक्त गस्त आयोजीत करण्यात येते तसेच सागरी किनारी भागात नियमित पेट्रोलींग नेमण्यात येते.

समुद्रामध्ये बोटी/जहाजांवर संशयित हालचाली आढळून आल्यास कोस्टल हेल्पलाईन क्र. १०९३ वर सपंर्क करणेबाबत सुचित केले आहे.

सतर्कता तपासण्यासाठी नियमित सागरी सुरक्षा अभियाने राबविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महावितरणच्या स्मार्ट विद्युत मीटरच्या अवाजवी किमतींबाबत

**(७) * २११२१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरणने स्मार्ट विद्युत मीटर बसविण्याचे कंत्राट अदानी, एनसीसी, मॉटेकार्ला आणि जीन्स या कंपनीना दिले असल्याची बाब दिनांक २४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्मार्ट मीटरची किंमत १२००० रुपये इतकी असून सर्वसामान्य जनतेस ती परवडणारी नाही, स्मार्ट मीटरच्या किंमतीत केंद्राचा वाटा ६० टक्के आणि उर्वरित ४० टक्के महावितरणचा असून महावितरण सदरचा भार संपूर्ण ग्राहकांकडून आकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्वसामान्य ग्राहकांकडून वसूल करण्यात येत असलेला अवाजवी भार कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार सुधारित वितरण क्षेत्र योजनेच्या (RDSS) अंतर्गत ग्रामीण विद्युतीकरण निगम लिमिटेड (Rural Electrification Corporation Limited) यांनी प्रमाणित केलेल्या निविदेनुसार महावितरण कंपनीने जिल्हानिहाय स्मार्ट विद्युत मीटर बसविण्याच्या निविदा प्रकाशित केल्या आहेत. त्यानुसार महावितरणव्दारे जिल्हानिहाय स्मार्ट विद्युत मीटर बसविण्यासाठी मे.अदानी, मे.एनसीसी, मे.मॉन्टेकार्लो आणि मे.जीन्स या निविदाकारांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याला सुधारित वितरण क्षेत्र योजनेच्या (RDSS) अंतर्गत स्मार्ट मीटर प्रकल्पाकरीता मंजूरी दिलेली आहे. याप्रमाणे केंद्र शासनाकडून महावितरणला रुपये ९०० प्रति ग्राहक मीटर इतके अनुदान देण्यात येणार आहे. महावितरणमार्फत वीज ग्राहकांना मोफत स्मार्ट मीटर बसवून देण्याचे नियोजन आहे. यामुळे महावितरण कंपनीच्या वीज ग्राहकावर कोणत्याही स्वरुपाचा आर्थिक भार पडणार नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पोलीस वसाहतींत राहणाऱ्या पोलिसांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत

**(८) * २११७१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बीडीडी चाळीत राहणाऱ्या पोलिसांना मालकी हक्काची घरे देण्यात आली असून, त्याच धर्तीवर मुंबईतील इतर पोलीस वसाहतीतील पोलिसांना ते वास्तव्य करित असलेल्या घरांचे मालकी हक्क देण्यात यावेत अशी मागणी पोलिसांकडून केली जात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस वसाहतींतील पोलिसांना घरांचा मालकी हक्क देण्याच्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) बी.डी.डी. चाळींमधील पोलीसांना सेवानिवासस्थानांच्या बदल्यामध्ये मालकी तत्वावर पुनर्विकसित गाळा देण्याचा ज्याप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे, त्याच धर्तीवर अन्य शासकीय सेवानिवासस्थानामधील अधिकारी-कर्मचारी मालकी तत्वावर गाळ्यांची मागणी करित आहेत, त्यांच्या

मागण्यांचा विचार केल्यास सदरहू प्रकल्पाच्या व्यवहार्यतेवर प्रतिकूल परिणाम होईल. त्यामूळे अशा मागण्यांचा विचार करण्यात येऊ नये, असा दिनांक ०९/०१/२०२३ रोजीच्या मा.मुख्यमंत्री यांच्या आढावा बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

## मुंबईच्या अंधेरी (पूर्व) येथील पी.एम.जी.पी. वसाहतीतील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत

**(९) * २२१५६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या अंधेरी (पूर्व) येथील पी.एम.जी.पी. वसाहतीतील धोकादायक इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील बाल्कनीचा स्लॅब कोसळल्याची घटना दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १६ वर्षांपासून पी.एम.जी.पी. वसाहतीतील सुमारे १७ इमारतींचा पुनर्विकास रखडला असल्याने घरातील छताचा भाग कोसळण्याच्या घटना वारंवार घडत असून तब्बल ९९४ कुटुंबे जीव मुठीत घेवून वास्तव्य करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वसाहतीतील इमारतींची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले असून पी.एम.जी.पी. वसाहतीतील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे. सदरची घटना दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी घडली आहे.

(३) म्हाडामार्फत दिनांक १३/१०/२०२३ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली आहे. सदर इमारत जीर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. पी.एम.जी.पी. वसाहतीमधील इमारतींचा पुनर्विकास वि.नि.नि. ३३(९) अंतर्गत म्हाडामार्फत निविदा प्रक्रियेद्वारे C & DA तत्वावर विकासकाची नेमणूक करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासन स्तरावर प्राधान्याने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुलगाव (जि.वर्धा) येथे पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने गोदामातून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याबाबत

**(१०) * २१६०० श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुलगाव (जि.वर्धा) येथे पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने खाजगी गोदामावर छापा टाकून तीन ट्रक सह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, उक्त अहवालानुसार शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलीस विभाग व पुरवठा विभाग यांचेकडून करण्यात आलेल्या संयुक्तिक कार्यवाहीत खाजगी गोदामावर छापा टाकून ८८,१५५ किलो तांदूळ व ३ ट्रक जप्त करण्यात आले होते.

(२) पोलीस स्टेशन पुलगाव, जि.वर्धा येथे अप. क्र.६७७/२०२३ कलम ३, ७ जिवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून तपास सुरू आहे.

जप्त केलेला मुद्देमाल खराब होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी, वर्धा यांनी मुद्देमाल विल्हेवाटीचे दिनांक १२/०९/२०२३ चे आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशानुसार सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल ८८,१५५ किलो तांदूळासाठी रुपये १७,०५,०००/- व ३ ट्रक रुपये ३४,४१,२२२/- अशा एकूण रुपये ५१,४६,२२२/- इतक्या कॅश सिक्यूरिटीवर संबंधितांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

सदर प्रकरणानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा यांच्या दिनांक १९/०८/२०२३ च्या आदेशान्वये देवळी तालुक्यातील सर्व रास्त भाव दुकान तपासणीकरीता पथक नेमण्यात आले. तपासणीत आढळून आलेल्या दोषाच्या अनुषंगाने २ रास्तभाव दुकान निलंबित करण्यात आले व २२ रास्तभाव दुकानदार यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली.

प्राधिकृत रास्तभाव दुकानदार तसेच खुल्या बाजारातील घाऊक व किरकोळ अनुज्ञाप्ती धारकांवर शासनाच्या दिनांक १२/०६/२०२३ च्या अधिसुचनेद्वारे गहू साठा, तुर, उडीद डाळीचा साठा मर्यादा लागू करण्यात आली आहे.

साठवणूक करून कृत्रीम टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण करून काळाबाजार तसेच भाववाढ होऊ नये यासाठी जीवनावश्यक वस्तु कायदा अधिनियम, १९५५ अंतर्गत कारवाई तसेच वेळोवेळी तपासण्या करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाविद्यालयांतील इतर मागास वर्ग, अनुसूचित जाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याबाबत

**(११) * २१३४७ श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभियांत्रिक, फार्मसी, कृषी महाविद्यालयातील इतर मागास वर्ग, अनुसूचित जाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय दिनांक ८ जानेवारी, २०१९ च्या आदेशानुसार महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती करीता शासन आणि विद्यापीठाकडून आवश्यक शिक्षण शुल्क मंजुरी घेऊन कार्यवाही वेळेत पूर्ण करणे गरजेचे असताना महाविद्यालये दिरंगाई करत असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन शिष्यवृत्तीची रक्कम वर्ग करणे तसेच महाविद्यालयांना कालमर्यादा देणे आदींबाबत धोरण आखणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) राज्यातील महाविद्यालयांनी शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभाग, शिक्षण शुल्क समिती व विद्यापीठांकडून मान्य होणाऱ्या शिक्षण शुल्क विहित वेळेत पोर्टलवर संबंधित सक्षम यंत्रणांकडून अद्ययावत करणे आवश्यक आहे. याबाबत महाविद्यालयांकडून अथवा सक्षम यंत्रणांकडून पोर्टलमध्ये फी अद्ययावत करणे प्रलंबित असल्यास शिष्यवृत्ती वितरणास विलंब होत असल्याने महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत संबंधितांना वेळोवेळी सूचित करण्यात येते.
(३) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीकरीता प्राप्त झालेल्या तरतूदीपैकी रुपये १४३५.४३ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच, सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापर्यंत प्रलंबित असलेली शिष्यवृत्ती तसेच मार्च, २०२४ पर्यंत महाडिबीटी प्रणालीवर प्राप्त होणाऱ्या अपेक्षित अर्जांच्या अनुषंगाने अदा करावयाची शिष्यवृत्ती याकरीता रुपये १७५० कोटी ची पुरवणी मागणी आगामी हिवाळी अधिवेशनात प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर निधीमधून प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याची तजवीज आहे.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या बाबत राज्य शासनाचा ४०% चा हिस्सा वितरीत करण्यात आलेला आहे. मात्र केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना देय होणाऱ्या ६०% हिश्श्याबाबतचे धोरण न्याय प्रविष्ट असून केंद्र हिश्श्याची अदायगी प्रलंबित आहे.

राज्यातील महाविद्यालयातील अभ्यासक्रमांची शुल्क रचना प्रत्येक शैक्षणिक वर्ष सुरु होण्याअगोदर विहित वेळेत मान्य करुन महाडीबीटी पोर्टलमध्ये अद्ययावत करण्याबाबतच्या सूचना शिक्षण शुल्क समिती, संबंधित शैक्षणिक विभाग व सक्षम यंत्रणांना समाज कल्याण आयुक्तालय स्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच केंद्र हिस्सा (६०%) शिष्यवृत्तीची रक्कम केंद्र शासनामार्फत अदा होईल व यादरम्यान विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडवणूक करण्यात येऊ नये यास्वरुपाचे शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील उरण पूर्व विभागातील खाडी किनाऱ्यावरील खार बांधबंधिस्तीची दुरूस्ती करण्याबाबत

**(१२) * २१७८९ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील उरण पूर्व विभागातील पिरकोण, आवरे, गोवठाणे, बांधपाडा ग्रामपंचायत हद्दीतील पांगरी, सांगपाले, काशी पारंगी रेवचावळा या खाडी किनाऱ्यावरील खार बांधबंधिस्ती समुद्राच्या पाण्याने उद्धवस्त झाले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समुद्रातील खारे पाणी शेत जमिनीत शिरल्याने लागवडीखाली असलेली भात शेती नष्ट होऊन हजारो एकर भात शेती नापीक होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भात शेतीच्या संरक्षणासाठी असलेल्या खार बांधबंधिस्तीची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

उरण पूर्व विभागातील पिरकोण, आवरे, गोवठणे, बांधपाडा ग्रामपंचायत हद्दितील पांगरी, सांगपाले, काशी पारंगी रेवचावळा या खाडी किनाऱ्याच्या भागात पिरकोण, गोवठणे व सांगपाले या ३ खाजगी खारभूमी योजना असून आवरे ही शासकीय खारभूमी योजना आहे. आवरे योजना सुस्थितीत आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

आवरे या शासकीय खारभूमी योजने लगतच्या खाजगी योजनांना खांडी पडल्यामुळे त्यालगत असणाऱ्या शेत जमिनीत खारे पाणी शिरुन भात शेती नापीक होण्याचा धोका निर्माण झाला आहे. परंतु आवरे ही शासकीय खारभूमी योजना सुस्थितीत असून किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे.
(३) सन २०२३-२४ विस्तार व सुधारणा लेखाशिर्षांतर्गतच्या मंजूर प्रापणसूचीमध्ये आवरे खारभूमी योजनेच्या नुतनीकरणाचा समावेश असून सदर काम मार्च, २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

खाजगी ६ योजनांपैकी पिरकोण, गोवठणे व सांगपाले या योजना सुस्थितीत नसून, खाजगी योजनांवर कामे प्रस्तावित करणेसाठी सदर योजना शासनाच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे. खारभूमी विभागांतर्गत रायगड जिल्ह्यांमधील खाजगी खारभूमी योजना शासनाच्या ताब्यात घेण्यासाठी शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.

सदर योजना शासनाच्या ताब्यात येताच यथोचित शासकीय नियमांचे पालन करुन त्यानुसार दुरुस्तीची तसेच नुतनीकरणाची कामे प्रस्तावित करणे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील सुमारे ६०० हून अधिक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१३) * २१२७७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सचिन अहिर, श्री.राजहंस सिंह, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या हजारो रहिवाशांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारुन जीवनमान उंचविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध योजनांद्वारे पुनर्वसन प्रकल्प राबविले जात असून झोपडपट्टीवासीयांना इमारतीत दोन-तीन वर्षात हक्काचे घर मिळवून देण्याबाबत लेखी करार करुनही यातील ६०० प्रकल्प विविध कारणांमुळे १५ ते २० वर्षे प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील योजना अंमलात आली तेव्हा मुंबईत ४० लाख लोकसंख्या झोपडपट्टीत वास्तव्य करित होती, त्यावेळी सुमारे २० लाख घरे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला होता, परंतु गेल्या २८ वर्षांमध्ये केवळ दोन ते अडीच लाख घरे बांधण्यात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला यश आले असून, बरेच प्रकल्प प्रलंबित असल्याने संक्रमण शिबिरात अनेक वर्ष वास्तव्यास असणारे नागरीक, थकीत घरभाडे असणारे नागरीकांकडून गृहनिर्माण संस्था प्राधिकरणाच्या कार्यालयात घरभाडे मिळण्याकरीता व अन्य सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्राधिकरणार्तंगत मुंबईत अनेक इमारती या दाटीवाटीने बांधलेल्या असून, सदर इमारतींमध्ये पुरेशी मोकळी जागा नसणे, नागरिकांना गाडी पार्कींगची व्यवस्था उपलब्ध करुन दिलेली नसणे, तसेच इलेक्ट्रीक केबिन इमारतीच्या जिण्याखाली किंवा एखाद्या कोपऱ्यात बांधण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरात अशाप्रकारे निकृष्ट दर्जाचे इमारतींचे होणारे बांधकाम रोखण्याकरीता व मुंबईतील सुमारे ६०० हून अधिक प्रलंबित प्रकल्पांना गती देवून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विविध योजनांमध्ये धोरणात्मक बदल करुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे आहे.
(२) ज्या योजनांना आशय पत्र निर्गमित केले आहे त्यांचा आढावा घेतला असता, अंदाजे २१९ योजना विविध कारणास्तव रखडलेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर २१९ योजनांपैकी २२ योजना ह्या न्यायालयीन प्रकरणामुळे तर २२ योजना ह्या विविध प्राधिकरणांच्या ना-हरकती प्राप्त न झाल्याने रखडलेल्या आहेत. त्यापैकी CRZ-II च्या ना-हरकती अभावी-१०, विमानपत्तन प्राधिकरणाच्या ना-हरकती अभावी-०१, MOEF च्या ना-हरकती अभावी -४ तर संरक्षण विभागाच्या ना-हरकती अभावी -०७ योजना रखडलेल्या आहेत.

सदर ना-हरकती प्राप्त करण्याकरीता संबंधित प्राधिकरणासोबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच १६६ योजना ह्या विकासकाकडे अर्थसहाय्य उपलब्ध होत नसल्याने रखडलेल्या आहेत.

तसेच ९ योजनांमधील विकासकांवर कलम १३(२) अंतर्गत कारवाई करण्यात आली असून संस्थेस नविन विकासकाची नियुक्ती करण्याबाबत मुभा देण्यात आली आहे.

या व्यतिरिक्त ५१७ योजना केवळ स्वीकृत झाल्यानंतर पुढील कोणत्याही परवानग्या प्राप्त न झाल्याने रखडलेल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पुनर्वसन इमारतीकरीता प्रकल्प नियोजन सल्लागार (PMC) व त्रयस्त पक्ष गुणवत्ता परिक्षक (TPQA) नेमणे विकासकास बंधनकारक आहे. सदर PMC व TPQA यांनी बांधकाम गुणवत्तेबाबतचा दाखला (Report) प्राधिकरणाकडे देणे आवश्यक आहे.

ना-हरकती अभावी रखडलेल्या योजनांकरीता संबंधित प्राधिरकरणासोबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्याकरीता निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे व अभय योजना राबविण्यासाठी शासन मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## जत (जि.सांगली) येथील नगरसेवक हत्या प्रकरणातील आरोपींना अटक करण्याबाबत

**(१४) * २१३८६ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) येथील नगरसेवकाची भरदिवसा गोळ्या झाडून केलेल्या हत्येस ५ महिने होऊनही तसेच पुरावे देऊनही पोलीस आरोपींना पकडण्यास टाळाटाळ करित असल्याचा आरोप पीडित कुटुंबियांनी केला असून, पोलीस प्रशासनाचा निषेध म्हणून पीडित कुटुंबियांनी व नागरिकांनी उपोषण, निवेदन करूनही अद्याप पोलीस प्रशासनाकडून मुख्य आरोपींना पकडण्याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींना अटक करण्याबाबत तसेच दोषींना पाठीशी घालणाऱ्या पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर घटना दिनांक १७/०३/२०२३ रोजी घडल्यानंतर याप्रकरणी दिनांक १८/०३/२०२३ रोजी जत पोलीस ठाणे, सांगली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात ६ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ४ आरोपींना दिनांक २०/०३/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर ४ आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दिनांक १३/०९/२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. उर्वरीत २ आरोपी फरार असून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे खास पथके तयार करुन राज्यात व परराज्यात विविध ठिकाणी त्यांचा शोध घेण्यात येत आहे. या व्यतिरिक्त राज्यात सर्व पोलीस घटकांकडे आरोपींचा तपास होण्यासाठी तपास याद्या पाठविल्या आहेत.

फरार २ आरोपींपैकी एका आरोपीबाबत मा.प्रथम वर्ग न्यायालय, जत यांच्याकडून सी.आर.पी.सी. कलम ७३ अन्वये "स्टँडींग वॉरंट" प्राप्त करुन घेण्यात आले आहे. दुसऱ्या आरोपीची माहिती प्राप्त करुन घेण्यात येत असून आरोपींचा शोध घेणेकामी पोलिसांकडून तपास पथके तयार करण्यात आले आहे. सदर आरोपीस अटक करुन त्यांचेविरुध्द पुरवणी दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर करण्याची कारवाई पोलिसांकडून करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इतर मागासवर्ग समाजासाठी नॉन क्रिमीलेअर मर्यादा २० लाख करणेबाबत

**(१५) * २२१६४ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इतर मागासवर्ग समाजाला आरक्षणांचा लाभ घेण्यासाठी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करावे लागत असून सदरहू प्रमाणपत्रासाठी सन २०१७ मध्ये आठ लाख रुपयांच्या उत्पन्नाची मर्यादा निश्चित करण्यात आली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उत्पन्नाची मर्यादा दर तीन वर्षानी वाढविणे अपेक्षित असते परंतू मागील सहा वर्षाचा कालावधी उलटूनही केंद्र शासनाने उत्पन्नाची मर्यादा वाढविली नसून ओबीसीं व्यक्तींनी वर्ग तीन व चार कर्मचाऱ्यांचे वेतन आणि शेतीपासून मिळणारे उत्पन्न वगळून नॉन क्रिमीलेअरची मर्यादा रुपये २० लाख करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी इतर मागासवर्ग समाजाला नॉन क्रिमीलेअरचा लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मागासवर्गीय भटके, विमुक्त मध्यमवर्गीय शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षणाचा लाभ मिळावा यानुषंगाने नॉन-क्रिमिलेयर उत्पन्न मर्यादा ही वार्षिक आठ लाखावरून किमान १५ लाख करण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

तथापि, दिनांक १३/०१/२००९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये केंद्र शासनाने (नॉन क्रिमिलेअर) उच्च व उन्नत गटात मोडत नसल्या संदर्भात जे निकष व निर्देश दिलेले आहेत, तेच निकष व निर्देश महाराष्ट्र राज्यातील उच्च व उन्नत गटासाठी लागू राहतील. तसेच, केंद्र शासनाकडून यापुढे ज्या ज्या वेळी उत्पन्न मर्यादेत वाढ केली जाईल, तीच उत्पन्न मर्यादा यापुढे महाराष्ट्र राज्यातील आरक्षण सोयी सवलतीकरीता उन्नत व प्रगत गट / व्यक्ती या करीता लागु राहील, असे नमूद आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सारथी संस्थेच्या योजनांची जनजागृती करून लाभार्थींसाठी असलेली वार्षिक उत्पन्नाची अट शिथिल करण्याबाबत

**(१६) * २१०६८ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा व कुणबी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाकरीता पुणे येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानवविकास (सारथी) संस्था सन २०१८ मध्ये शासनाने स्थापन केली असून सदर संस्थेला शासनाने आजतागायत भरीव आर्थिक तरतूद करुनही लाभार्थ्यांची संख्या दरवर्षी कमी होत असून लाभधारकांची संख्या १ लाख, ३३ हजार २३६ एवढी असतानाही खर्च कमी होत असल्याचे दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेकडे मोठ्या प्रमाणात लाभार्थी येत असून संस्थेचे लाभधारक ठरण्यासाठी वार्षिक उत्पन्न रूपये ८ लाखांच्या आत (Creamy Layer) असणे आवश्यक असून या योजनांची जनजागृती कमी झाल्याने लाभार्थ्यांचा पुरेसा प्रतिसाद मिळत नसल्याचे नियोजन विभागाचे मा.प्रधान सचिव यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सारथी संस्थेच्या योजनांबाबत जनजागृती मोहिम राबवून तसेच वार्षिक उत्पन्नाची अट शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

सारथी संस्थेकडून वेगवेगळया उपक्रमांची आखणी करुन नियोजनबध्द पध्दतीने उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये ८१,१४० एवढ्या लक्षित गटातील लाभार्थ्यांवर रुपये १३०.८३ कोटी इतका खर्च झाला असून चालू आर्थिक वर्षात माहे नोव्हेंबर, २०२३ अखेर १,३९,६३७ एवढ्या लाभार्थ्यांवर रुपये ११८.५२ कोटी इतका खर्च झाला आहे. उर्वरित शिल्लक निधी माहे मार्च २०२४ अखेर पर्यंत योग्य व पात्र लाभार्थ्यांवर विविध उपक्रमांच्या माध्यमातून खर्च होण्यासाठी नियोजन सारथी संस्थेने केले आहे.

(२) व (३) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) ची स्थापना सन २०१९ झाली आहे. गेल्या ४ वर्षामध्ये जनमाणसांमध्ये प्रसारित होण्यासाठी बातम्या, समाजमाध्यमे, भित्तीपत्रके, शिबिरे इत्यादीद्वारे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सारथीच्या योजनांची माहिती सारथी संस्थेमार्फत प्रसारित करण्यात येत आहे. यामुळे २०१९-२० मध्ये ९५२ लाभार्थी, २०२०-२१ मध्ये ८५३२ लाभार्थी, २०२१-२२ मध्ये १३३१२ लाभार्थी, २०२२-२३ मध्ये ८११४० लाभार्थी आणि २०२३-२४ मध्ये १३९६३७ लाभार्थींनी लाभ घेतला आहे. २०२३-२४ मध्ये आजपर्यंत ७७३५९ लाभार्थींमध्ये वाढ झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या आंदोलकांवर पोलिसांनी लाठीहल्ला व गोळीबार केल्याबाबत

**(१७) * २२०३३ ॲड.अनिल परब, श्री.अंबादास दानवे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या नागरिकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन केले असता उक्त आंदोलकांवर पोलिसांनी लाठीहल्ला व गोळीबार केल्याने अनेक आंदोलक जखमी झाले असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी ३६६ आंदोलकांवर गुन्हे दाखल केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने आंदोलकांवर लाठीहल्ला व गोळीबार करण्याच्या सूचना देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन मराठा आंदोलकावर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०१/०९/२०२३ रोजी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे सुरु असलेल्या उपोषणाच्या अनुषंगाने श्री.मनोज जरांगे पाटील यांची तब्बेत बिघडल्यामुळे त्यांना विनंती करुनही त्यांनी उपोषण मागे घेतले नाही. आंदोलनादरम्यान उपस्थित समर्थकांनी त्यांना उपचाराकरीता घेऊन जाण्यास नकार देऊन प्रशासनास विरोध करुन पोलीसांनी निघून जावे म्हणून जोर-जोरात घोषणा देऊ लागले व पोलीसांवर दगडफेक करु लागले. या दगडफेकीत ७० ते ७५ पोलीस जबर जखमी झाले. या जमावाला पांगविण्यसाठी पोलीसांनी बळाचा वापर केला, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या, नंतर सौम्य लाठीचार्ज केला तरीही आंदोलक नियंत्रित न झाल्याने त्यांच्यावर प्लॅस्टिक बुलेट व आवाज होणारे हॅन्ड ग्रिनेड यांचा वापर करण्यात आला. तसेच हवेत गोळीबार देखील करण्यात आला.
(२) सदर प्रकरणी १६ व्यक्तीविरुध्द व अनोळखी इतर ३०० ते ३५० व्यक्तींविरुध्द पो.स्टे.गोंदी येथे गुरनं ३६९/२०२३ कलम ३०७, ३३३, ३५३, ४२७, ४३५, १२०(ब), १४३, १४७, १४८, १४९ भादंवि सह कलम १३५ मुपोका सह कलम ३ सा.नु.प्र.का. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) जालना जिल्ह्यातील मौजे अंतरवाली सराटी येथे मराठा आंदोलनादरम्यान दिनांक ०१/०९/२०२३ रोजी झालेल्या लाठीचार्ज प्रकरणात अपर पोलीस महासंचालक (का. व सु.) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार,

अ) जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले होते. त्यानंतर त्यांची जिल्हाबाहेर बदली करण्यात आली आहे.

ब) अतिरिक्त पोलीस अधीक्षक, जालना, सहायक पोलीस निरीक्षक व प्रभारी, गोंदी पोलीस ठाणे, जालना व उप विभागीय पोलीस अधीक्षक, अंबड यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

मराठा आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याच्या अनुषंगाने तपासणी करुन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत अंमली पदार्थांची विक्री व तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१८) * २१३९७ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये परदेशातून मोठ्या प्रमाणात येणाऱ्या अंमली पदार्थांच्या तस्करीत वाढ झाली असून या तस्करीतून आलेल्या पैशांचा वापर दहशतवादी कारवायांसाठी होत असल्याने राज्याच्या दहशतवाद विरोधी पथकाने तस्करी करणारे व त्याची खरेदी-विक्री करणाऱ्यांना लक्ष्य केले असून पोलीस दल अंमली पदार्थाचे साठे जप्त करित असले तरी या अंमली पदार्थाची तस्करी थांबलेली नसल्याने तरुण वर्ग गुन्हेगारीच्या विळख्यात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेवून मुंबईतील तसेच राज्यातील अंमली पदार्थाची तस्करी व विक्री थांबविण्यासाठी तसेच ड्रग विक्री व तस्करी करणाऱ्या ड्रग माफियांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबई शहरामध्ये ऑक्टोबर, २०२३ पर्यंत एकूण १२६० गुन्हे दाखल केले आहेत. त्यामध्ये १५४५ आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण २३९४ कि.ग्रॅ. अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेला आहे. तसेच अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांविरुध्द एकूण ८२९९ गुन्हे दाखल केले असून ८२२९ सेवनार्थी विरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे.

अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालीलप्रमाणे उपययोजना करते.

- मुंबई शहरामध्ये अंमली पदार्थ तस्करांविरुध्द विशेष मोहीमा, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत
- विशेष पोलीस महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून शासन निर्णय दिनांक ०६/०१/२००७ अन्वये घोषित करण्यात आले आहे
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
- जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील रूबी हॉल क्लिनिकमध्ये कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) * २१७४३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.जयंत पाटील, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात ग्रांट मेडिकल फाऊंडेशनच्या रुबी हॉल क्लिनिक हॉस्पिटलमध्ये मूळ उत्पन्नाच्या तुलनेत कमी उत्पन्न दाखवून धर्मादाय आयुक्तांची फसवणूक करुन मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामान्य तसेच गरीब रूग्णांसाठी वेळीच आणि दर्जेदार उपचार मिळावे यासाठी धर्मादाय रुग्णालयात विशेष खाटांची सुविधा देण्याची तरतूद असून, गरीब रूग्णांच्या इंडिजट पेशंट फंडचा (आयपीएफ फंड) गैरवापर करुन गोरगरीब रुग्णांसाठी असलेला निधी खर्च करावा लागू नये आणि त्यानिधीचा गैरवापर करण्यासाठी अत्यल्प उत्पन्नाचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरीब रुग्णांवर मोफत, सवलतीच्या दरांत उपचार होण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमच्या कलम ४१ क अंतर्गत रूग्णांवर किती निधी खर्च केला याबाबत दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ रोजी वा त्यासुमारास चौकशी करण्यात यावी अशी मागणी सहधर्मादाय आयुक्तांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी रूबी हॉल क्लिनिक रुग्णालयाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत धर्मादाय रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक १९/११/२०१२ अन्वये तपासणी व उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आल्या असून पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णांलयांची दिनांक १९/०६/२०२३ ते दिनांक २२/०६/२०२३ दरम्यान तपासणी केली होती. सदर तपासणी दरम्यान ग्रॅंट मेडिकल फाऊंडेशनच्या रुबी हॉल क्लिनिक या न्यासामार्फत चालविल्या जाणाऱ्या वानवडी व हिंजवडी या धर्मादाय रुग्णालयांकडून दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०७/२०२३ पर्यंत दाखल केलेल्या बॅंक व आयपीएफ विवरणपत्रांमध्ये तफावत दिसून आली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) सदर प्रकरणी धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांनी दिनांक ३१/०८/२०२३ रोजी आदेश पारित केले असून किरकोळ अर्ज क्रमांक ८०/२०२३ नुसार प्रकरण न्यायिक चौकशीसाठी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यातील तरुणपिढी इंटरनेटवरील ऑनलाईन गेमच्या विळख्यात सापडत असल्याबाबत

**(२०) * २१४७० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तरुण पिढीला ऑनलाईन रमी सर्कल, जंगली रमी, तीन पत्ती, ए. २३ सारख्या जाहिरातीमधून जुगार खेळण्यासाठीचे आवाहन करणाऱ्या जाहिरातीवर बंदी आणून त्याचा प्रसार करणाऱ्या अभिनेता–अभिनेत्री व चॅनल्स यांच्यावर कारवाई करून सर्व प्रकारचे ऑनलाईन जुगार बंद करणेबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तरुणपिढी ऑनलाईन रमी, सुडोकु, तीन पत्ती, क्रिकेट, कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी अशा इंटरनेटवरील अनेक ऑनलाइन गेमच्या विळख्यात सापडत असल्याचे तसेच तरुण विद्यार्थी गुन्हेगारीकडे वळत असून घरातील लाखो रुपयांची संपत्ती आई, बहीण, बायको यांचे दागिनेही विकून ऑनलाईन जुगारात पैसे हरलेल्या अनेकांची कुटुंबे उद्ध्वस्त झाल्यामुळे निराशेने आत्महत्या करण्याच्या प्रवृत्तीकडे वळत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन रमी, जुगार आदींना आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि तामिळनाडू या राज्यांनी पूर्णपणे बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने उक्त गेमवर बंदी आणून तरुण पिढीला यातून बाहेर काढण्याकरीता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ऑनलाईन गेमच्या माध्यमातून अनेक तरूण व्यसनाधीन होत आहेत. ऑनलाईन गेममध्ये सतत पैसे हरल्याने चंद्रपूर जिल्ह्यात १ हत्या व १ आत्महत्या, ठाणे शहर आयुक्तालयात २ आत्महत्या, रायगड जिल्ह्यामध्ये १ आत्महत्या, नाशिक ग्रामीण येथे २ आत्महत्या आणि गोंदीया शहर येथे १ आत्महत्या बाबत गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

(३) ऑनलाईन गेमिंग बाबत तेलंगणा राज्याने दिनांक ०२/१२/२०१७, आंध्र प्रदेश राज्याने दिनांक ३१/१२/२०२० व तामिळनाडू राज्याने दिनांक १०/०४/२०२३ रोजी राजपत्रात अधिनियम/सुधारणा अधिनियम प्रसिध्द केलेले आहेत.

(४) ऑनलाईन गेमिंग बाबत सन २०२१-२०२३ मध्ये भा.दं.वि. तसेच, महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ अन्वये जळगाव जिल्ह्यात १, नवी मुंबई-१, नाशिक शहर-१९, नाशिक ग्रामीण-१५ व ठाणे शहर-५ असे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याद्वारे ऑनलाईन जुगारातून होणारे दुष्परीणाम, सायबर गुन्हे, सोशल मिडीयाचा योग्य वापर याबाबत विविध १९५८ शाळा/महाविद्यालयांत भेटी देऊन ३,५३,५९१ शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच सामान्य नागरिकांची जनजागृती करण्यात आली आहे.

ऑनलाईन गेमवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत Information Technology (Intermediary Guidelines and Digital Media Ethics Code) Rules, २०२१, दिनांक ०६/०४/२०२३ रोजी राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नावे बोगस कर्ज दाखवून कोट्यवधी रूपयांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(२१) * २१५४८ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील मौदा, पारशिवनी व रामटेक तहसिल मधील असलेल्या शेतकऱ्यांच्या उत्पादित मालावर तारण दाखवून तथा बनावट कागदपत्रांच्या आधारे बॅंकेतील शेतकऱ्यांच्या खात्यातील रक्कम काढून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या नावावर केलेली रुपये ११३ कोटींची आर्थिक गुंतवणुक ही स्वतःच्या १२ कंपन्यांमध्ये गुंतवणुक करून शेतकऱ्यांच्या नावावर घेतलेली कर्जाची परतफेड न करता शेतकऱ्यांच्या ७/१२ वर कर्जाची नोंद दाखवून त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील नोंदी वगळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ओला दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसान भरपाई देण्याचे व इतर आमिष दाखवून शेतकऱ्यांच्या कागदपत्रांच्या आधारे एकूण रुपये ७७,७८,३८,४००/- इतके कर्ज घेऊन सदरची रक्कम विविध कंपन्या आणि स्वतःच्या नावे असलेल्या बँक खात्यामध्ये वळवून शेतकऱ्यांच्या नावे घेतलेल्या कर्जाची परतफेड न केल्याने शेतकऱ्यांची एकूण रुपये ११३,४६,९९,००३/- (बँक व्याजासह) इतक्या रकमेची आर्थिक फसवणूक केल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे.

(३) होय. प्रस्तुत प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलीस स्टेशन मौदा, नागपूर ग्रामीण येथे भादंवि. कलम १२०(ब), १०९, ४०९, ४१३, ४२०, ४६७, ४६८, ४७१ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम, कलम ६६ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम कलम ३ नुसार दिनांक ३०/०८/२०२३ रोजी गुन्हा रजि.नं. ७८३/२०२३ दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासाकरीता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली ७ सदस्यीय विशेष तपास पथकाची (SIT) स्थापना केली असून या पथकामार्फत पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान विषयाधीन गुन्ह्यातील कर्ज शेतकऱ्यांनी घेतलेले नसल्याने सदर कर्जाची वसुली करू नये याकरीता आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर यांच्याकडून कर्ज वसुली न्यायाधिकरणास पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच, महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम कलम ३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर अधिनियमातील तरतुदीनुसार आरोपीच्या मालमत्ता जप्त करून त्यावर अपहारित रक्कम परतफेड करण्याकरीता आरोपीच्या मालमत्तांची माहिती गोळा करण्याची कार्यवाही सुद्धा सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पारोळा (जि.जळगाव) येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(२२) * २१८४० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा (जि.जळगाव) येथे १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार करण्यात आला असून पिडीतेने प्रतिकार केला असता नराधमाने मुलीच्या डोक्यात दगड मारून दोरीने गळा आवळून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक १० ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पिडीतेस न्याय देण्यासंदर्भात पोलीस प्रशासनाकडून कोणती कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पारोळा (जि.जळगाव) येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सदर प्रकरणी पारोळा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३४१/२०२३ भादंवि कलम ३०७, ३७६(३), ३५४ सह पोक्सो कायदा कलम ८, १०, १२ अन्वये दिनांक १०/०८/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी पिडीतेची वैद्यकीय तपासणी करून उपचार करण्यात आले आहेत. घटनास्थळावरील नमूने घेण्यात येऊन रासायनिक प्रयोगशाळा, नाशिक येथे तपासणीकरीता पाठविण्यात आले आहेत. गुन्ह्यातील आरोपी सद्य:स्थितीत न्यायालयीन कोठडीत असून दिनांक ०६/१०/२०२३ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मद्य उत्पादक कंपन्यांना नवीन विक्री परवाने न देण्याबाबत

**(२३) * २२१८७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन १९७३ पासून दारु विक्रीच्या दुकानांचे नवीन परवाने देणे बंद असताना मद्य उत्पादक कंपन्यांना नवीन विक्री परवाने देण्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाने प्रस्तावित केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यःस्थितीत प्रत्येक जिल्ह्यात एक दारु उत्पादक कंपनीस परवाना दिलेला असतानाही नवीन विक्री परवाने दिल्यास राज्यातील तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाने मद्य उत्पादक कंपन्यांना मद्य विक्री परवाने देण्याचा घेतलेला निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) हे खरे नाही.

सन २०२३-२४ करीता महसूल वाढीच्या अनुषंगाने मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली ऑगस्ट, २०२३ मध्ये आयोजित बैठकीमध्ये विविध विभागांचा आढावा घेण्यात आला. सदर बैठकीमध्ये महसूल वृद्धीच्या अनुषंगाने विविध पर्यायाविषयी चर्चा करण्यात आली, त्यापैकी विदेशी मद्य उत्पादन करणाऱ्या घटकांना (पीएलएल) विदेशी मद्य विक्री करण्यासाठी मद्य विक्रीची नवीन अनुज्ञप्ती देण्याच्या एका पर्यायाविषयी केवळ चर्चा झालेली असून परवाने देण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

भारतीय बनावटीचे विदेशी मद्य (IMFL) उत्पादन घटकांना संपूर्ण राज्यात केवळ एक मद्य विक्री अनुज्ञप्ती देण्याचे धोरण असून अशा घटकांना नवीन विक्री परवाने देण्याचा निर्णय झालेला नाही. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) येथे "एक शेतकरी एक डीपी" योजना राबविली जात नसल्याबाबत

**(२४) * २१६७४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील शेती आणि शेतकऱ्यांचा विकास व्हावा या दृष्टीकोनातून राज्य आणि केंद्र शासनाकडून राज्यातील शेतकऱ्यांसाठी 'एक शेतकरी एक डीपी' ही योजना अंमलात आणली असून, मोखाडा (जि.पालघर) येथे या योजनेचा प्रचार व प्रसार न झाल्याने शेतकऱ्यांना या योजनेविषयी माहिती मिळत नसल्याची बाब दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचा ग्रामीण भागात प्रचार व प्रसार करण्याची गरज असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) महावितरण कंपनीच्या पालघर विभागीय कार्यालयांतर्गत मोखाडा या उप विभागाचा समावेश होतो. मोखाडा तालुक्यात महावितरणमार्फत ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या बैठकीत “एक शेतकरी एक डीपी” या योजनेचे शेतकऱ्यांना महत्व पटवून देण्यात आले आहे. तसेच, महावितरण कंपनीच्या मोखाडा उपविभागातील जनमित्राव्दारे सदर योजनेबाबत शेतकऱ्यांमध्ये प्रसार व जनजागृती करण्यात आली आहे.

पालघर विभागामध्ये उच्चदाब वितरण प्रणाली योजनेंतर्गत (एक शेतकरी एक डीपी योजना) सन २०१९-२० ते सन २०२२-२३ मध्ये एकूण १५७ कृषी वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या सर्व विभागांमध्ये सर्व संवर्गातील एकूण मंजूर पदांच्या ३० टक्के पदे रिक्त असल्याबाबत

**(२५) * २२२०७ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाच्या ३२ विभागांमध्ये ७ लाख २४ हजार ८०८ अधिकारी / कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असून त्यातील ४ लाख ८३ हजार ८९५ पदे भरलेली आहेत तर २ लाख ३९ हजार ९०३ पदे तसेच राज्यातील सर्व श्रेणीतील एकूण मंजूर पदांच्या ३० टक्के पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षित प्रवर्गापैकी इतर मागात प्रवर्गाची (ओबीसी) १६ टक्के पदे रिक्त असल्याची माहिती वित्त विभागाने जाहीर केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या आकडेवारीतून निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंजूर पदांच्या ३० टक्के रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) नाही.

(२) नाही.

(३) देशाच्या ७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्ताने मंत्रालयीन प्रशासकीय विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना शासन निर्णय दिनांक ३१/१०/२०२२ अन्वये १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी संबंधित ८० टक्के रिक्त पदे भरण्यास आणि लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील ५० टक्के पदे भरण्यास अनुमती देण्यात आली होती. सदर कालावधी आता संपुष्टात आला असल्याने शासन निर्णय दिनांक ३०/०९/२२ मधील तरतूदी लागू झाल्या आहेत. त्यानुसार ज्या विभाग व कार्यालये यांनी सुधारित आकृतिबंध उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने अंतिम केला आहे त्या विभागांना लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील सरळसेवेची १०० टक्के पदे भरण्याची अनुमती देण्यात आली आहे आणि लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील ५० टक्के पदे भरण्यास अनुमती देण्यात आली आहे. सर्व प्रशासकीय विभागांनी त्याप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गिरणी कामगारांच्या घरांच्या मागणीबाबत

**(२६) * २१७०२ श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १९८०६ ला दिनांक ३१ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरणी कामगारांना मुंबई तसेच उपनगरातील बंद गिरण्यांच्या जागेवर घरे बांधून मिळावीत, बंद गिरण्यांचा विकास नियमावली ५८ च्या नियमान्वये लावून त्या जागा कामगारांच्या घरासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात, एन टी सी गिरण्यांच्या जागेवर सुमारे ८ ते १० हजार घरे उपलब्ध होत असून दोन गिरण्या पूर्णपणे गिरणी कामगारांच्या घरासाठी देण्यात याव्यात अशी लेखी मागणी गिरणी कामगार संघटनांनी दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.गृहनिर्माण मंत्री यांना प्रत्यक्ष भेटून केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील पंतप्रधान आवास योजनेतील म्हाडा व खाजगी विकासक यांचेकडून बांधण्यात आलेली वसई पूर्व येथील ४६ हजार घरे तसेच एमएमआरडीएच्या घरांपैकी ५० टक्के घरे गिरणी कामगारांना देण्याचा निर्णय घेण्यात आला असून भिवंडी,पनवेल कोनगाव येथील घरांची सोडत काढण्यात यावी अशीही मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी गिरणी कामगारांना तातडीने घरे देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) गिरणी कामगारांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांकडे झालेल्या बैठकीनुसार कार्यवाही सुरू आहे.
(२) व (३) प्रधानमंत्री आवास (शहरी) अंतर्गत म्हाडा व खाजगी विकासक याच्याकडून बांधण्यात येणारी घरे गिरणी कामगारांना देण्याबाबत निर्णय झालेला नाही.

तसेच कोन, पनवेल येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कढील रेंटल हौसिंग ची २४१७ जोड सदनिका गिरणी कामगारांना देण्यासाठी डिसेंबर, २०१६ मध्ये सोडत काढण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धाराशिव नगरपालिकेंतर्गतच्या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यातील तपासात आनंदनगर पोलीस निरीक्षक दिरंगाई करित असलेबाबत

**(२७) * २१६३२ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव नगरपालिकेतील २१ लाख ६४ हजार ९२२ व २७ कोटी रुपयांच्या गैरव्यवहारा प्रकरणी दिनांक ३१ जुलै, २०२३ व दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी शासनातर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन आनंदनगर पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी लेखापाल यांचा अटकपूर्व जामीन अर्ज दिनांक २० ऑगस्ट, २०२३ रोजी जिल्हा न्यायालयाने फेटाळला असूनही आनंदनगर पोलिसांनी अद्याप त्यांच्यासह तत्कालीन अंतर्गत लेखापरिक्षक यांनाही अटक केलेली नाही**,** हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २७ कोटी रूपयांच्या प्रकरणात ५१४ प्रमाणके गहाळ असतानाही आनंदनगर पोलिसांकडून आरोपींना अटक करुन सखोल तपास करण्याऐवजी आरोपींना मदत केली जात असून संबंधित पोलीस निरीक्षक व आरोपींचे संगनमत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने दोषींवर व दोषींना पाठीशी घालणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, धाराशिव नगर पालिकेतील रुपये २१,६४,९२२/- व रुपये २७,३८,७८,१००/- इतक्या रकमेच्या गैरव्यवहाराबाबत आनंदनगर पोलीस ठाणे, धाराशिव येथे अनुक्रमे गु.र.नं.२९२/२०२३ व गु.र.नं.३१८/२०२३ असे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) सदर गैरव्यवहार प्रकरणी एकूण दोन गुन्हे दाखल असून त्यामधे ३ आरोपींचा समावेश आहे. या ३ आरोपींपैकी १ आरोपी हा तत्कालीन अंतर्गत लेखापरिक्षक असून तो फरार आहे. सदर आरोपीचा शोध पोलीसांकडून घेण्यात येत आहे. उर्वरित आरोपींपैकी १ आरोपी तत्कालीन मुख्याधिकारी नगर पालिका, धाराशिव हा असून सध्या सदर आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. तसेच प्रश्नाधीन लेखापाल ह्या आरोपीस अटक करण्यात आली असून सदर आरोपी पोलीस कस्टडी रिमांड मध्ये आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी पोलीस अधीक्षक, धाराशिव यांनी विशेष तपास पथक (एस.आय.टी.) स्थापन केले असून सदर पथकामार्फत तपास सुरु आहे.

सदर गुन्ह्यात तपास करणाऱ्या तत्कालीन अधिकारी व गुन्ह्यातील आरोपी यांचे संबंध आहेत किंवा कसे याबाबत प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश उप विभागीय अधिकारी, उप विभाग धाराशिव, जिल्हा धाराशिव यांनी दिले आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## पुसेगांव (ता.खटाव, जि.सातारा) येथे शेती पंपाच्या व नगदी पिकांच्या चोरीच्या तक्रारींची दखल न घेतल्याबाबत

**(२८) * २११४४ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसेगांव (ता.खटाव, जि.सातारा) येथील पोलीस उपनिरीक्षक यांचेकडे तेथील नागरिकांनी शेतकऱ्यांच्या शेतातील शेतपंपाची मोठ्या प्रमाणावर चोरी होत असल्याबाबत माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान अनेक तक्रारी दाखल केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खटाव तालुक्यातील पुसेगांव तसेच दरजाई येथील शेतकऱ्यांच्या शेतीपंपांच्या व नगदी पिकांच्या मोठ्या प्रमाणात चोऱ्या होत असून यासंदर्भात पोलीस स्टेशनला तक्रारी करूनही तेथील पोलीस उपनिरीक्षक याकडे दुर्लक्ष करित असून सदर शेतकऱ्यांना गुन्हेगारांप्रमाणे वागणूक देत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या शेतपंपाच्या चोरीचा गुन्हा नोंदवून न घेणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पुसेगांव (ता.खटाव, जि.सातारा) या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतातील शेती पंपाची मोठ्या प्रमाणावर चोरी होत असल्याबाबत प्राप्त तक्रारी वरुन माहे जुलै व ऑगस्ट २०२३ मध्ये पुसेगांव पो. ठाणे मध्ये एकूण ०३ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. या गुन्ह्याचा तपास करुन एकूण ११ शेतीपंप हस्तगत करण्यात आलेले आहेत. तसेच नगदी पिकांची चोरी झाल्याबाबत प्राप्त तक्रारीवरुन पुसेगांव पो. ठाणे गु.र.नं.१२१/२०२३ भा.दं.वि.क. ३७९ प्रमाणे दिनांक २२/०६/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा ग्रामीण विभाग यांनी चौकशी केली असून चौकशीमध्ये पोलीसांनी शेतकऱ्यांच्या शेतीपंप चोरीच्या तक्रारी बाबत गुन्हे नोंदविण्यास टाळाटाळ केल्याचे आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवशेतपाडा (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील आदिवासी पाड्यावर वीजपुरवठा करण्याबाबत

**(२९) * २२३४८ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवशेतपाडा (ता.शहापूर, जि.ठाणे) अजनूप ग्रामपंचायतेतील आदिवासी पाड्यावर १५ घरे असून गावांत ७० पेक्षा अधिक लोकवस्ती असून स्वातंत्र्य काळापासून आजतागायत वीज पुरवठा नसल्यामुळे आजही तेथील आदिवासी विजेअभावी अंधारात राहत असल्याचे तसेंच विद्यार्थ्यांना रात्रीच्यावेळी अभ्यास करता येत नसल्याने मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असून तेथील नागरीकांना गैरसोयींना समोर जावे लागत असल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिवशेत पाड्याजवळच एक किलोमीटर अंतरावर भेरेपाडा येथे महावितरण कंपनीची विद्युत लाईन असून तेथील शिवशेत पाड्यासाठी वीज जोडणी घेण्याबाबत ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी विद्युत कंपनीशी वारंवार पत्रव्यवहार करुनही विद्युत कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यामध्ये अजनूप ही ग्रुप ग्रामपंचायत आहे. सदर ग्रामपंचायतीमध्ये शिवशेत नावाचा पाडा मागील काही वर्षात नव्याने अस्तित्वात आला आहे. मागील ५ ते ७ वर्षात काही कुटुंबे शेजारील गोपालपाडा व भेरेपाडा येथून स्थलांतरीत होऊन शेती करण्यासाठी शिवशेत पाडा येथे वास्तव्यास आली आहेत.

(२) व (३) अजनूप ग्रामपंचायत (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील शिवशेतपाडा या आदिवासी पाड्यावर आजतागायत वीज पुरवठा नसल्याची बातमी दिनांक १२/०९/२०२३ रोजी वर्तमानपत्रात छापुन आल्यामुळे सदर ठिकाणी वीजपुरवठा नसल्याची बाब निदर्शनास आली होती. त्यानुसार, महावितरण कंपनीमार्फत दिनांक १३/०९/२०२३ रोजी सदर ठिकाणी पाहणी करुन तांत्रिक अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे.

शिवशेतपाडा येथील एकूण १५ ग्रामस्थांनी नवीन वीज पुरवठा घेण्याकरीता महावितरणकडे अर्ज सादर केले असून, सदर ग्राहकांनी मागणी पत्रकानुसार वीज जोडणीसाठी आवश्यक असलेल्या रक्कमेचा भरणा केलेला आहे. शिवशेतपाडा येथे वीज पुरवठा करण्याकरीता भेरेपाडा येथून ६ पोल व धापटेपाडा येथून १६ पोलची लघुदाब विद्युत वाहिनी उभारण्याचे काम महावितरणमार्फत पूर्ण करण्यात आले असून एकूण १५ अर्जदारांना दिनांक २७/११/२०२३ रोजी वीज मीटर बसवून वीज पुरवठा देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रकल्पातील सदनिकांमध्ये बेकायदा वास्तव्य करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(३०) * २२५०३ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्पातील मोफत पुनर्वसनाच्या अनेक इमारतींमध्ये पात्र झोपडीधारकांऐवजी इतर व्यक्ती बेकायदा वास्तव्य करित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशिररित्या राहणाऱ्यांच्या सदनिका ताब्यात घेण्याची कारवाई करण्याचे अधिकार शासन व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्पातील विकासकाकडून पर्यायी घरांचे भाडे थकविण्यात आल्याने ८९ पात्र लाभार्थी झोपडीधारकांनी याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्पातील सदनिकांमध्ये बेकायदा वास्तव्य करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(ई) व कलम ३३ नुसार अनिधिकृत वास्तव्य करणाऱ्यांच्या सदनिका ताब्यात घेण्याचे अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) सदनिकांमध्ये अनधिकृत वास्तव्य करित असलेल्या प्रकरणांमध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(ई) अन्वये नोटीसा देण्यात आल्या. त्यापैकी २३३ सदनिकांमध्ये वास्तव्य करणाऱ्यांविरुध्द निष्कासनाची कारवाई करुन, सदनिका झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने ताब्यात घेतल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील दरडग्रस्त तळीये गावात केवळ ६६ घरेच बांधण्यात आली असल्याबाबत

**(३१) * २२५२८ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील दरडग्रस्त तळीये गावाचे शासनामार्फत पुनर्वसन करण्यात येत असून म्हाडा तर्फे २७१ घरे बांधण्याचे उद्दिष्ट असतानाही दोन वर्षात केवळ ६६ घरेच बांधण्यात आली असून त्या घराबाहेरील सुविधांची अनेक कामे प्रलंबित असल्याने दरडग्रस्त नागरिक अद्याप येथे राहण्यास गेले नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडा कडून २७१ घरांचे बांधकाम तात्काळ पूर्ण करून दरडग्रस्त नागरिकांना सर्व मूलभूत सुविधा देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) मौजे तळिये, ता.महाड, जि.रायगड येथे दिनांक २३ व २४ जुलै, २०२१ रोजी अतिवृष्टीने बाधित झालेल्या कुटुंबांचे म्हाडामार्फत पुनर्वसन करण्यात येत आहे.

२२७ सदनिकांपैकी २०० सदनिकांचे काम प्रगतीपथावर असून ७१ सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सदरहू ७१ सदनिकांपैकी ६६ सदनिकांचा ताबा जिल्हाधिकारी, रायगड यांच्यामार्फत देण्यात येणार आहे. तसेच, उर्वरित सदनिकांचे बांधकाम जून, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे म्हाडाचे नियोजन आहे.

रस्ते, सांडपाणी, पिण्याचा पाणीपुरवठा, संरक्षक भिंत, रस्त्यालगत व उतारावरील भूखंडासाठी स्टोन पिचींगची कामे व बाह्य विद्युत पुरवठा, दिवाबत्ती ही कामे जिल्हा परिषद, रायगड व महावितरण यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुण्यातील येरवडा कारागृहातील सुरक्षा व्यवस्था सक्षम करण्याबाबत

**(३२) * २१८२३ श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील येरवडा कारागृहात कैदयांच्या गटात मारहाणी होत असून कडक सुरक्षा व्यवस्था असतानाही तुरुंगात पोहोचणारे मोबाईल व अंमली पदार्थ तसेच कैद्यांचे संशयास्पद मृत्यू आणि आत्महत्या इत्यादींमध्ये वाढ होत असल्याची बाब माहे ऑक्टोंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर जिल्ह्याच्या कोपर्डी अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी जितेंद्र शिंदे यांनी कारागृहात गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, त्यामुळे कारागृहातील अपप्रकारामुळे सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने येरवडा कारागृहामध्ये घडणाऱ्या अपप्रकारांची चौकशी करून, सदर चौकशीच्या अनुंषगाने येरवडा कारागृहाची सुरक्षा व्यवस्था सक्षम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पुण्यातील येरवडा कारागृहातील कैद्यांमध्ये मारहाणीच्या काही घटना घडल्या आहेत. तसेच कारागृह प्रशासनाकडून विशेष मोहिमा राबवून कारागृहातील बंद्यांकडून व परिसरामध्ये मोबाईल फोन हस्तगत करण्यात आलेले आहेत. सन २०२३ मध्ये सदर कारागृहातील एका बंद्याने आत्महत्या केली होती. तथापि, अंमली पदार्थ तसेच कैद्यांचे संशयास्पद मृत्यू आणि आत्महत्या इ. मध्ये वाढ होत असल्याची बाब खरी नाही.

(२) देहांत शासन शिक्षाबंदी जितेंद्र ऊर्फ पप्पु बाबुलाल शिंदे याने दिनांक १०/०९/२०२३ रोजी सुरक्षा विभाग क्र.१ येथील खोली क्र.१४ मध्ये टॉवेलच्या कापडी पट्टीच्या सहाय्याने स्वत: गळफास बनवून खोलीच्या दरवाजावरील लोखंडी पट्टीला बांधून पहाटे अंदाजे ०५.५८ वा. दरम्यान आत्महत्या केली होती. तथापि, सदर बंद्याच्या आत्महत्येमुळे कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले नाही.

(३) येरवडा कारागृह प्रशासनामार्फत गोपनीय माहितीच्या आधारे तसेच परिणामकारक विशेष मोहिमा राबवून बंद्यांकडून व परिसरामध्ये मोबाईल हस्तगत केलेले आहेत. या प्रकरणी एकूण २६ बंद्यांविरुध्द स्थानिक येरवडा पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच कर्तव्यात सचोटी व संशयास्पद वर्तन असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची बदली, प्रतिनियुक्ती व सुरक्षेच्या कारणास्तव इतरत्र बदली करण्यात आलेली आहे.

कारागृह व्यवस्था चोख राहण्यासाठी हॅन्ड व डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, बॅगेज स्कॅनर, डिप सर्च मेटल डिटेक्टर या विविध आधुनिक सुरक्षा उपकरणांचा प्रभावीपणे वापर करण्यात येतो. तसेच सदर कारागृहाकरीता एक्सरे बेस्ड फुल ह्युमन बॉडी स्कॅनर तसेच सीसीटीव्ही कॅमेरे खरेदीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. मुख्य तटभिंतीच्या आतील व बाहेरील परीसरात पेट्रोलिंग अधिक प्रभावी करण्यात आले आहे. कारागृहातील अतिगर्दी कमी करण्याच्या अनुषंगाने नवीन बॅरेक्स बांधण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. कारागृहाच्या अस्तित्वातील जागेवर नवीन कारागृह बांधण्याचे प्रस्तावित आहे. माहे जून, २०२३

पासून कारागृहामध्ये स्मार्ट कार्ड दुरध्वनी सुविधा सुरु करण्यात आली आहे. सुरक्षा व्यवस्थेच्या अनुषंगाने प्रभावी नियंत्रण होण्याकरीता कारागृह विभागाच्या अस्तित्वात असलेल्या पदांव्यतिरिक्त विविध संवर्गात नव्याने २००० पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यापैकी येरवडा मध्यवर्ती कारागृहासाठी विविध संवर्गात ३६४ पदे मंजूर झाली असून पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(३३) * २१८३२ श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हा हा अंमलीपदार्थ मुक्त जिल्हा असल्याची घोषणा दिनांक १९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास करण्यात आल्यानंतर आठवडाभरात म्हणजेच २५ ऑगस्ट, २०२३ रोजी नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर पोलिसांनी विनापरवाना वाहतूक होत असलेल्या देशीदारुचा ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केलेला असून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गांजाची शेती असल्याचेही निदर्शनास आल्यामुळे पोलीस प्रशासन व इतर विभाग हे अंमली पदार्थ तस्करांना पाठिशी घालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नंदुरबार जिल्हा दिनांक १८/०८/२०२३ रोजी अंमली पदार्थ मुक्त असल्याची घोषणा केली आहे.नंदुरबार जिल्हा पोलीस दलाने स्वयंस्फुर्तीने व पुढाकार घेऊन दिनांक ०१/०३/२०२३ पासून जनजागृती, सातत्यपूर्ण प्रतिबंध व कायदेशीर कारवाई अशा कार्यपध्दतीने सदर योजना राबवली आहे.

नवापूर पोलीस ठाणे येथे दिनांक २५/०८/२०२३ रोजी गु.र.नं. ४०५/२०२३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये गुन्हा दाखल असून एकूण रुपये ०८,९१,९२०/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

२०२३ मध्ये नंदुरबार जिल्ह्यात गांजा शेतीवर ४ कारवाया केल्या असून यात रुपये ९७,३२,३२२/- किंमतीची गांजा झाडे जप्त करण्यात येऊन ५ आरोपी अटक करण्यात आले आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील शेतकरी सिंचनापासून वंचित असल्याबाबत

**(३४) * २२००६ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील कोल्हापुरी बंधाऱ्याचे तब्बल २३४ गेट चोरीस गेल्याने सिंचनाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे शेतकरी सिंचनापासून वंचित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला जिल्ह्यातील सर्व कोल्हापूर बंधाऱ्यांचा आढावा घेऊन या बंधाऱ्यांची देखभाल व दुरुस्ती करून शेतीच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) अंशत: खरे आहे.

लघु पाटबंधारे विभाग जि.प.अकोला अंतर्गत ७ कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्यांचे एकूण २३३ गेट चोरी गेलेले आहेत. गेट चोरी गेल्यामुळे ७ बंधाऱ्यांवर होणाऱ्या एकूण सिंचनाच्या ३७ % सिंचन कमी होत आहे.
(२) अकोला जिल्ह्यातील ७ को.प.बंधाऱ्यांचे २३३ चोरी गेलेल्या गेटचे नवीन गेट पुरविण्याचे अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता प्राप्त असून निधी मागणी प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पुरवणी आराखड्यात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गिरणी कामगारांच्या घरांच्या किंमतीवर म्हाडाने आकारलेले व्याज माफ करण्याबाबत

**(३५) * २१०९५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरणी कामगारांना घरांची किंमत भरताना विलंब झाल्याने म्हाडाने संबंधितांकडून आकारलेले दंड व्याज माफ करण्यात आल्याची घोषणा शासनाने केली असूनही त्याची अंमलबजावणी म्हाडाने केली नसल्याची बाब दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू दंड व्याज माफ करण्याबाबतचे परिपत्रक शासनाने निर्गमित केले नसल्याने म्हाडा अधिकारी गिरणी कामगारांकडून दंड व्याज वसूल करित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने गिरणी कामगारांच्या घरांच्या किंमतीवर म्हाडाने आकारलेले दंड व्याज माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) गिरणी कामगारांच्या घरांसाठी काढण्यात येणाऱ्या सोडतीतील यशस्वी गिरणी कामगारांना विहित कालावधीत विक्री किंमतीचा भरणा करता न आल्यास त्यावरील व्याज आकारणी दिनांक ०७/०७/२०२३ पासून रद्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिंदेगाव (जि.नाशिक) येथील कारखान्यामधून कोट्यवधी रूपयांचे अंमली पदार्थ जप्त केल्याबाबत

**(३६) * २१०८४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील साकीनाका पोलिसांनी नाशिक जिल्ह्यातील शिंदे गावात छापा टाकून एम.डी. (मेफेड्रॉन) तयार होणाऱ्या कारखान्यातून ३०० कोटी रुपयांचा मुद्देमाल दिनांक ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक पोलिसांनी देखील शिंदे गावातील दुसऱ्या एका कारखान्यात टाकलेल्या छाप्यात चार किलो आठशे ग्रॅम एम.डी.सह इतर रसायन असा पाच कोटी ९४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाच गावात एम.डी. या कुख्यात अंमली पदार्थाचे दोन-दोन कारखाने सुरू असून, नाशिक हे नशेचे नवीन ठिकाण बनल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाशिक जिल्ह्याला नशा मुक्त करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गट नं ४५३, शिंदे-नायगाव रोड, शिंदेगाव, ता.जि.नाशिक येथे दिनांक ०७/१०/२०२३ रोजी पोलीस आयुक्त,नाशिक यांनी टाकलेल्या छाप्यामध्ये रुपये ०५,८४,४०,०००/- किंमतीचा ४.८७० कि.ग्रॅ. वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) नावाचा अंमली पदार्थ तसेच रुपये ०५,९४,६०,३००/- इतक्या किंमतीचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ बनविण्याकरीता लागणारा कच्चा माल व इतर मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

(३) पोलीस आयुक्त, नाशिक यांनी टाकलेल्या छाप्यातील कारखान्यात एम.डी. (मेफेड्रॉन) तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल तयार करणारे गोदाम होते. त्या अनुषंगाने नाशिक रोड येथे दिनांक ०८/१०/२०२३ रोजी गु.र.न.४६०/२०२३ एन.डी. पी.एस. अधिनियम १९८५ चे कलम ८(सी), २२(सी), २९ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

(४) नाशिक जिल्ह्याला नशा मुक्त करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

- इंदिरा नगर पोलीस ठाणे येथे दिनांक ०५/१०/२०२३ रोजी गु.र.न.२६८/२०२३ एन.डी. पी.एस. अधिनियम १९८५ चे कलम ८(सी), २०(ब), २२(सी), २९ अन्वये गुन्हा दाखल केला असून ५ आरोपींना अटक करण्यात आले आहे.
- नाशिक रोड पोलीस ठाणे येथे दिनांक ०७/०९/२०२३ रोजी गु.र.न. ४२५/२०२३ एन.डी. पी.एस. अधिनियम १९८५ चे कलम ८(सी), २२(सी), २९ अन्वये गुन्हा दाखल केला असून ११ आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.
- सदर घटनेनंतर तात्काळ नाशिक पोलीस आयुक्तालय हद्दीतील शिंदेगाव, अंबड, सातपुर परिसरातील एमआयडीसी हद्दीत, बंद गोडाऊन, कारखाने येथे विशेष पथकांमार्फत तपासणी केली असता सदर अनुषंगाने आक्षेपार्ह काहीही आढळुन आले नाही.

- नाशिक पोलीस आयुक्तालयातील गर्दीचे, सार्वजनिक ठिकाणी, शाळा, कॉलेजेसमध्ये विद्यार्थ्यांशी, नागरीकांशी संवाद साधुन तसेच सोशल मिडीया प्लॅटफॉर्मद्वारे नशामुक्तीचे अनुषंगाने मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कनेरसर (ता.खेड, जि.पुणे) येथे स्वतंत्र पोलीस चौकी उभारण्याबाबत

**(३७) * २१२६२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कनेरसर (ता.खेड, जि.पुणे) येथील मा.उपसरपंच यांची हत्या झाल्यानंतर तसेच सदर परिसरातील गुन्हेगारीच्या संख्येत वाढ झाल्याने एसईझेड या क्षेत्रात स्वतंत्र पोलीस चौकी उभारण्याबाबत सामाजिक कार्यकर्ते यांनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस चौकी उभारण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीकरीता तत्कालीन पोलीस अधीक्षक यांचेमार्फत पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविण्यात आला असून, सदर प्रस्ताव गत अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याने सदरील विभागात मोठ्या प्रमाणात गुन्ह्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कनेरसर (ता.खेड. जि.पुणे) येथे गुन्हेगारीची वाढती संख्या पाहता सदरील एसईझेड क्षेत्रात स्वतंत्र पोलीस चौकी उभारण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) "कनेरसर, ता.खेड, जि.पुणे येथे पोलीस चौकीच्या प्रस्तावास मंजूरीबाबत" या विषयाचे निवेदन दिनांक ०९/१०/२०२३ रोजी गृह विभागास प्राप्त झाले आहे.

(२) खेड पोलीस ठाणे अंकित खेड सेझ परिसरात नवीन पोलीस ठाणे निर्मितीबाबत खेड पोलीस ठाणेकडून दिनांक १८/०५/२०२२ अन्वये प्रस्ताव पुणे ग्रामीण कार्यालयास प्राप्त झालेला आहे. तथापि, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक दिनांक १५/०६/२०१९ व शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक २५/०८/२०२३ अन्वये नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने पोलीस अधीक्षक, पुणे (ग्रामीण) कार्यालयामार्फत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास प्रस्ताव पाठविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) सदर प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही. प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार तपासून कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विटा (जि.सांगली) येथील पोलीस स्टेशनचे अधिकाऱ्यांनी खोटा गुन्हा दाखल केल्याबाबत

**(३८) * २१३६३ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (जि.सांगली) येथील पोलीस स्टेशनचे अधिकारी व सुरज मुल्ला यांनी संगनमत करून सागर जगदाळे यांच्यावर बोगस गुन्हा दाखल करून दोन किलो सोने हडप केल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १२ मे, २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मा.पालकमंत्री, सांगली यांनी याबाबत आठ दिवसात कारवाई करण्याचे आश्वासन देऊन तसेच सर्व पुरावे तक्रारदारांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना देवूनही आजमितीस दोषींवर अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) विटा पोलीस स्टेशन ता.खानापूर, जि.सांगली येथे सोने व्यावसायिकांकडून त्यांच्या सोन्याचा अपहार झाल्याप्रकरणी प्राप्त तक्रारीवरुन दिनांक १६/०२/२०२३ रोजी गु.र.नं. ८१/२०२३ भादंवि कलम ४०८, ३४ अन्वये ५ आरोपींवर दिनांक १६/०२/२०२३ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

गुन्ह्यातील एका आरोपीकडून १०० ग्रॅम सोने व त्यांने विक्री केलेले ४५५ ग्रॅम सोने असे एकूण ५५५ ग्रॅम सोने जप्त करण्यात आलेले आहे. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदर सोने फिर्यादीच्या ताब्यात देण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत लोकप्रतिनीधी या अनुषंगाने प्रश्न उपस्थित केला होता. सदर प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी चौकशी केली असून पोलिसांनी बोगस गुन्हा दाखल केल्याचे दिसून येत नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. तथापि, तपासामधील निष्काळजीपणा बाबत तपासी अधिकारी व पोलीस शिपाई यांना सक्त ताकीद देण्यात आली असून एका पोलीस हवालदाराची एक वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

गु.र.नं. ८१/२०२३ भादंवि कलम ४०८, ३४ मध्ये दिनांक ०८/०२/२०२३ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केलेले आहे. सदरचे प्रकरण सद्य:स्थित न्यायप्रविष्ट आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसीकरण न करण्याबाबत

**(३९) * २२१७२ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मराठा समाजास सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन त्यांचे ओबीसीकरण करू नये व ओबीसी समाजाच्या इतर रास्त मागण्यांसाठी नागपूर व चंद्रपूर येथे राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्यावतीने श्री.रवींद्र टोंगे हे दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजी पासून उपोषणास बसले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रालयात दिनांक २९ सप्टेंबर, २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी राष्ट्रीय ओबीसी महासंघ व ओबीसी शिष्टमंडळाच्या बैठकीत ओबीसी समाजाच्या सर्व मागण्या मान्य करून व दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ रोजी श्री.रवींद्र टोंगे यांचे उपोषण सोडविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंत्रालयात झालेल्या बैठकीत राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार मराठा समाजास सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन त्यांचे ओबीसीकरण करू नये व ओबीसी समाजाच्या इतर रास्त मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सद्य:स्थितीत मराठा समाजाच्या ओबीसीकरणाबाबतची कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही. तसेच, ओबीसी समाजाच्या इतर विविध मागण्यांबाबत संबंधित विभागांना कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले असून त्याप्रमाणे संबंधित विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची शेकडो एकर जमीन विकासकाने बनावट कागदपत्रे बनवून बळकावल्याबाबत

**(४०) * २१९५७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) येथील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनींची बनावट कागदपत्रे बनवून एका विकासकाने जमीन बळकावल्या प्रकरणी दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ रोजी शेतकऱ्यांनी आंदोलन करायचे ठरवले असता डोंबिवली पोलीस स्टेशनने शेतकऱ्यांना आंदोलन न करण्यासंदर्भात लेखी नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच संबंधित पोलिसांविरोधात कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी कल्याण (जि.ठाणे) येथील शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे उपोषणाला बसणार असल्याचे ठाणे नगर पोलीस ठाणे यांनी मानपाडा पोलीस ठाणे डोंबिवली यांना कळविल्याने मानपाडा पोलीस ठाणे यांच्याकडून कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने फौजदारी दंड संहिता कलम १४९ प्रमाणे आंदोलनकर्त्यांना नोटीस देण्यात आली आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी पोलीस ठाणे येथे कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याने चौकशी करण्यात आली नसून गुन्हा दाखल केलेला नाही. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईत पेट्रोल-डिझेलची तस्करी होत असल्याबाबत

**(४१) * २१४७९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई (तुर्भे) येथील एमआयडीसीत छापा मारुन टँकरमधील हजारो लीटर पेट्रोल-डिझेलची तस्करी करणाऱ्या चौघांना पोलिसांनी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही दिवसांत पुण्यातील नामांकित शिक्षण संस्थेच्या जवळच गॅस तस्करी करित असताना आग लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गॅस, पेट्रोल–डिझेलच्या तस्करीबाबत तसेच संबंधित आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

संबंधित हे पेट्रोलियम कंपनीच्या टँकर चालकासोबत संगनमताने टँकरमधून पेट्रोल/ डिझेल (तेल) काढून, साठा करून अवैधरित्या विक्रीसाठी घेऊन जाताना मिळून आले असल्याने सदरचा प्रकार हा तस्करीचा नसून अपहाराचा आहे.
(२) हे खरे नाही.
(३) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत तुर्भे पोलीस ठाणे येथे गु.र.जि नं.३२४/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४०८,३४ सह जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३,७,८ सह मोटार स्पिरीट ॲण्ड हाय स्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रीब्युशन ॲण्ड प्रिव्हेंशन ऑफ माल प्रॅक्टीसेस) ऑर्डर २००५ अन्वये अपहाराबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील कार नदीवर उपसा सिंचन व सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत

**(४२) * २१८१६ श्री.चंद्रशेखर बावनकुळे : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १४५१४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील मौजा कोल्हु, सावली, भोरगड, चैरेपठार, मोहगांव (ढोले), मोहगांव (जंगली) या गावांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून जवळपास ५०० हेक्टर जमीन ओलिताखाली आणणेबाबत कार नदी प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रात उपसा सिंचन प्रकल्प कार्यान्वित करणेबाबतचा प्रस्ताव नियामक मंडळाला सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प हा वन जमिनी क्षेत्र हद्दीतून ग्रामीण मार्गातून जात असून वन विभागाकडे परवानगीसाठी प्रकल्प प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या उपसा सिंचन प्रकल्पासोबतच कार नदीवर सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेस मान्यता प्रदान करून सिंचन क्षेत्रात वाढ करुन सौर ऊर्जाद्वारे आवश्यक विज निर्मिती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

चतुर्थ मंजूर सुधारीत प्रशासकीय मान्यता मध्ये नमुद असल्याप्रमाणे नियामक मंडळाच्या दिनांक १९/६/२०२३ रोजी झालेल्या ८३ व्या नियामक मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. ८३/३ (क) नुसार प्रस्तावास मान्यता प्राप्त आहे.
(२) सदर प्रस्तावास ०.९४९ हे. वन जमिनीची आवश्यकता असून, सदर वन जमीनीच्या वळतीकरणाचा प्रस्ताव उपवन संरक्षक नागपूर वन विभाग, नागपूर यांना दिनांक ७/११/२०२३ रोजी सादर करण्यात आला आहे.
(३) सौर ऊर्जावर आधारीत उपसा सिंचन योजना ही कार नदी प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता अंतर्गत मंजूर आहे.
(४) सदर उपसा सिंचन योजनेच्या परिगणकास दिनांक २५/१०/२०२३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली असून अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही प्रगतीवर आहे.
वनविभागाकडून वन जमिनीची मान्यता मिळाल्यानंतर, उपसा सिंचन योजनेचे बांधकाम हाती घेणे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुऱ्हा पानाचे शिवारातील (ता.भुसावळ, जि.जळगाव) हॉटेल मध्ये देहविक्रीचा व्यवसाय चालविला जात असलेबाबत

**(४३) * २१८४५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुऱ्हा पानाचे शिवारातील (ता.भुसावळ, जि.जळगाव) हॉटेल राजवाडा येथे हॉटेल मालक व त्याचे साथीदार हॉटेलमध्ये देह विक्रीचा व्यवसाय चालवित असून त्यामध्ये पोलिसांनी देहविक्री करणाऱ्या ३ महिलांना अटक केली असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी हॉटेल मालकास व त्याच्या साथीदारावर गुन्हा दाखल करुन संबंधित दोषीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) भुसावळ तालुका पोलीस स्टेशन, जि.जळगांव येथे गु.र.क्र.१७३/२०२३, कलम ३७० भा.द.वि. सह स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (सिट अधिनियम पुननिर्मित) कलम ३, ४, ५, ७ अन्वये दिनांक १३/०८/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील पाच आरोपींना अटक केली आहे. त्यापैकी कुऱ्हा पानाचे शिवारातील राजवाडा हॉटेल व लॉजिंगचे मालक व मॅनेजर असे दोन आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. तसेच एक आर्थिक व्यवहार करणारा आरोपी व दोन महिला आरोपी असे तीन आरोपी जामीनावर आहेत.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथे टोरंट वीज वितरण कंपनीकडून होत असलेल्या मनमानी कारभाराबाबत

**(४४) * २१५२१ श्री.अंबादास दानवे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील वीज वितरणाकरीता मे. टोरेन्ट पॉवर लि. या कंपनीस कंत्राट देण्यात आले होते. सदर कंपनी सक्तीची वीजबील वसूल करणे, वीज चोरी बाबत नागरिकांवर खोटे गुन्हे दाखल करणे, यंत्रमाग व्यवसाय व इतर व्यवसायिकांना नाहक त्रास देणे, अवाजवी देयके देवून नागरिकांची लूट करीत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. उप विभागीय अधिकारी, अधीक्षक अभियंता, भिवंडी, यांच्याकडे मे. टोरेन्ट पॉवर लि. या कंपनीसोबत केलेला वीज करार रद्द करण्याची मागणी तेथील नागरीकांनी निवेदनाद्वारे करुनही अद्यापही संबंधित विभागाकडून कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून टोरेन्ट पॉवर लि. या कंपनीवर कारवाई करुन त्याच्यांशी वीज वितरणाबाबतचा करार रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, भिवंडी वितरण फ्रॅन्चाइझी विभागात मे.टोरंट पॉवर लि. कंपनीव्दारे महावितरणपेक्षा अवाजवी वीजदेयके आकारणे, वीजमीटर जलद गतीने फिरणे, अवेळी वीज खंडीत करणे व थकबाकीसाठी तगादा लावणे अशा आशयाच्या तक्रारी काही लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाल्या आहेत. तसेच यामध्ये सदर कंपनीसोबतच्या करार रद्द करण्याची मागणीसुध्दा करण्यात आली आहे.
(३) सदर तक्रारींच्या अनुषंगाने महावितरण कंपनीमार्फत दिनांक १५/०९/२०२३ रोजीच्या आदेशान्वये मुख्य अभियंता, भांडूप शहर परिमंडळ यांचे अध्यक्षतेखाली चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती.

सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक ०६/१०/२०२३ रोजीच्या पत्रांन्वये महावितरण कंपनीस सादर केला आहे. सदर अहवालानुसार समितीने सर्व वर्गवारीतील नमूना वीज देयकाची पडताळणी केली असून, सर्व वर्गवारीच्या वीज ग्राहकांची वीज बीले मा.महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या दरांप्रमाणेच वीज देयक आकारण्यात येत असल्याचे तसेच त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आली नसल्याचे अहवालात नमूद केले आहे.

तसेच, महावितरण कंपनीमार्फत मे. टोरंट पॉवर लि. यांना सदर वितरण फ्रॅन्चाइझी विभागात वीज वितरण फ्रॅन्चाइझी करारातील तरतुदी व मा.महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या नियमावलीनुसारच कार्यपध्दतीचा अवलंब करणेबाबत सुचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महावितरणच्या सर्व्हरमधून वीज ग्राहकांची खाजगी माहिती उघड होत असल्याबाबत

**(४५)** * **२१६२३ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दोन कोटी पंचाहत्तर लाख ग्राहकांना वीज पुरवठा करणाऱ्या महावितरणच्या सर्व्हरमधून वीज ग्राहकांच्या नावापासून ते मोबाईल क्रमांक, वीज वापर, मासिक वीज देयक, भरणा केलेले देयक, थकीत देयक इ. ग्राहकांच्या बँक डिटेलसह महत्वपूर्ण माहिती (डाटा) महावितरणच्या सर्व्हरमधून उघड होत असल्याची धक्कादायक बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महत्वपूर्ण माहितीच्या आधारे वीज ग्राहकांना ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या टोळीकडून लक्ष्य केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व चौकशीच्या अनुषंगाने ग्राहकांच्या बँक डिटेलसह महत्वपूर्ण माहिती महावितरणच्या सर्व्हरमधून उघड न होण्याबाबत तसेच वीज ग्राहकांची ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, महावितरण कंपनीच्या वीज ग्राहकांना आर्थिक फसवणूक करण्याच्या हेतूने बनावट संदेश (SMS) येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर संदेशामध्ये ग्राहकांचा वैयक्तिक तथा वीज बिलासंबंधित कोणताही तपशील आढळून आलेला नाही.

(३) महावितरण कंपनीने केलेल्या चौकशीनुसार, सायबर गुन्हेगारांमार्फत ग्राहकांना बनावट संदेश पाठविण्यात येतो. सदर गुन्हेगारांनी पाठविलेल्या वैयक्तिक मोबाईल नंबरवर ग्राहकांनी संपर्क साधला तर त्यांच्याकडून ग्राहकाच्या कॉम्प्युटर किंवा मोबाईलचा ताबा घेता येईल असे एनीडेस्क किंवा तत्सम ॲप वीज ग्राहकास डाऊनलोड करण्यास सांगितले जाते किंवा एखादी बनावट लिंक ग्राहकास पाठविली जाते. त्याचा वापर करुन सायबर गुन्हेगार ग्राहकाची बॅकेविषयीची गोपनीय माहिती चोरुन फसवणूक करितअसल्याचे निदर्शनास आले आहे.

महावितरण कंपनीमार्फत कंपनीची वेबसाईट, कंपनीचे ॲप, सोशल मिडिया, संदेश (SMS) आणि बातम्यांव्दारे ग्राहकांना बनावट संदेशाद्वारे होणाऱ्या फसवणुकीपासून सतर्क करण्यासाठी आक्रमक मोहीम सुरु केली आहे. तसेच, महावितरणच्या ग्राहक सेवा केंद्रामार्फत ग्राहकांना बनावट संदेशाला प्रतिसाद न देण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. तसेच, महावितरणमार्फत पोलीस महानिरीक्षक (महाराष्ट्र सायबर विभाग) यांना दिनांक २९/०६/२०२२ रोजीच्या पत्रांन्वये आर्थिक फसवणुकीच्या वाढत्या घटनांसदर्भात कळविण्यात आले आहे. याशिवाय, महावितरण कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रेस नोटव्दारे बनावट संदेशास प्रतिसाद न देण्याचे आवाहन केले आहे.

महावितरण कंपनीमार्फत ऑनलाईन गैरव्यवहार करणाऱ्या टोळीकडून वीज ग्राहकांची फसवणूक होऊ नये याकरीता प्रादेशिक सायबर पोलीस स्टेशन (बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स), मुंबई येथे एफ.आय.आर. क्र. ०४/२२ दाखल केली आहे. तसेच, महावितरणच्या सर्व प्रादेशिक कार्यालयांतर्फे गृह मंत्रालय, केंद्र सरकार व्दारा संचलित राष्ट्रीय सायबर अपराध रिपोर्टिंग पोर्टलवर विविध तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

महावितरण कंपनीच्या विविध कार्यालयांनी संबंधित पोलीस स्टेशनला तक्रारी दाखल केल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने मुंबई सायबर पोलीसांनी झारखंड राज्यातील २ आरोपींना अटक केली होती व इतर २ आरोपींचा मा.सत्र न्यायालय, मुंबई यांनी अटक पूर्व जामीन मंजूर केला आहे. मुंबई सायबर पोलीसामार्फत गुन्हयातील अटक केलेल्या २ आरोपींविरोधात सबळ पुरावे गोळा करुन पुढील कारवाई सुरु आहे. तसेच, इतर आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंधळी (ता.माण, जि.सातारा) येथील दांपत्याच्या हत्येप्रकरणी गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत

**(४६) * २११४६ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंधळी (ता.माण, जि.सातारा) येथील पवारदरा शिवारात दिनांक ८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास दांपत्यांची निर्घुण हत्या करण्यात आली असून पोलिसांनी अद्याप मारेकऱ्यांना अटक केली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.संजय रामचंद्र पवार व मनिषा संजय पवार या दांपत्याची निघृण हत्या करणाऱ्या गुन्हेगांराना अटक करुन कारवाई करण्यासंदर्भात पोलिसांकडून जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्यामुळे जनसामान्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून मारेकऱ्यांना अटक व्हावी अशी मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पोलिसांनी मारेकऱ्यांना अटक करुन कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आंधळी, ता.माण, जि.सातारा येथील पवारदरा शिवारात दिनांक ०८/१०/२०२३ रोजी पहाटेच्या दरम्यान संजय रामचंद्र पवार व मनिषा संजय पवार या दांपत्याची हत्या घडल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये फिर्यादींनी दिलेल्या फिर्यादीनुसार दहीवडी पोलीस स्टेशन, सातारा येथे गु.र.नं. ७७३/२०२३ भा.दं.वि. कलम ३०२ प्रमाणे दिनांक ०८/१०/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक ०८/१०/२०२३ रोजीच अटक करण्यात आली असून आजस्थितीत सदर आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले साहित्य रासायनिक तपासणीकरीता पाठविण्यात आले असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीसांकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई, ठाणे आणि पुण्यातील सात प्रकल्पाची नोंदणी म्हाडाने रद्द केल्याबाबत

**(४७) * २२५४० श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, ठाणे आणि पुण्यातील सात प्रकल्पाची नोंदणी रद्द झाली असून खरेदीदार नसल्याने सदर प्रकल्प रद्द करण्याच्या महारेराने घेतलेल्या निर्णयामुळे बड्या आणि नामवंत विकासकांना चपराक बसली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास यामध्ये मुंबईतील मायक्रोटेक डेव्हलपर्स, श्रीजी कंट्रक्शन, श्रीजी कन्ट्रक्शनचा श्रीजी स्क्वेअर व ठाण्यातील मायक्रोटेक डेव्हलपर्सचा राऊत स्प्लेंन्डोरा टावर, पुण्यातील एवायजी अपार्टमेंट, कर्वेनगर टप्पा एक तर मीरा रोड येथील कोरल, सिंधुदुर्ग येथील सिद्धिप्रिया पार्क अशा प्रकल्पांचा यात समावेश आहे तसेच आतापर्यंत १७० प्रकल्पांतील विकासकांनी नोंदणी रद्द करण्यासाठी अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माक्रोट्रेक डेव्हलपर्सने खरेदीदाराकडून आवश्यक तो प्रतिसाद मिळत नसल्यामुळे दोनदा नोंदणी झाल्याचे कारण पुढे करत तसेच एवायजी रियाल्टीने नव्याने प्रस्ताव सादर करुन प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई, ठाणे आणि पुण्यातील सात नोंदणी प्रकल्प रद्द करण्यात आलेल्या निर्णयाबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

महारेरातर्फे आतापर्यंत १९ प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत. त्यापैकी १८ प्रकल्प हे खरेदीदार नसल्याने व १ प्रकल्पामध्ये विकासकाने खरेदीदारांचे पैसे व्याजासह परत केले असल्याने सदर प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत.

महारेराकडे आतापर्यंत नोंदणी रद्द करण्यासाठी २५७ अर्ज प्राप्त झालेली आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या आर्थिक सहाय्य योजनेकडे महाज्योतीचे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(४८) * २१८३१ श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.प्रवीण दटके, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रमेश कराड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या बार्टी आणि सारथी या संस्थाकडून स्थापत्य अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, निरीक्षक वैद्यमापन शास्त्र, अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थांना १५००० रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून वारंवार निधीच्या कमतरतेच्या कारणामुळे महत्वाच्या परिक्षांसाठी अद्यापही आर्थिक सहाय्य योजना सुरु न केल्याने हजारो विद्यार्थी लाभापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बार्टी व सारथीप्रमाणेच महाज्योतीलाही शासनाच्या नियमाप्रमाणे सदरहू विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्य योजना सुरु करण्याकरीता पुरेशा निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) च्या संचालक मंडळाने मान्यता प्रदान केल्यानुसार दिनांक १०/१०/२०२३ रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई यांचे मार्फत स्थापत्य अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, निरीक्षक वैद्यमापन शास्त्र, अन्न व औषध प्रशासकीय सेवा पुर्व परीक्षा २०२३ उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना एकरकमी रुपये १५०००/- अर्थसहाय्य योजनेचा लाभ देण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाज्योतीच्या संकेतस्थळावर इच्छूक उमेदवारांचे दिनांक २०/११/२०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आलेले होते. अर्जाची तपासणी सुरू असून पात्र उमेदवाराच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात येणार आहे.

(३) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षांत महाज्योती संस्थेकरीता रुपये २६९/- कोटीची पुरक मागणी सादर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनधिकृत नर्सिंग होमच्या माध्यमातून बालकांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४९) * २१०८६ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनधिकृत नर्सिंग होमच्या माध्यमातून बालकांची विक्री करणाऱ्या बोगस डॉक्टर आणि दलालांसह पाच महिलांच्या टोळीला दिनांक २ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास ट्रॉम्बे पोलिसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणात अटक करण्यात आलेल्या महिलेच्या विरोधातील हा सातवा गुन्हा असून सदर नर्सिंग होममध्ये येणाऱ्या गरजू महिलांना पैशाचे आमिष देत नवजात बालकांची सुमारे ७ ते १० लाखांत विक्री करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

सदर प्रकरणी ट्रॉम्बे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२४९/२३(सी.सी.टी.एन.एस.नं.४२६/२३) कलम ३७०, ३४ भादंवि सह ८१, ८७ जे.जे. ॲक्ट, सह कलम ३३ व ३६ महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून आरोपींना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे.

(३) सदर गुन्ह्याचा तपास सुरू असून सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महालक्ष्मी रेफ्रिजरेटर ॲण्ड एसी सर्विसेस या फर्मने एसीची खरेदी-विक्रीची खोटी माहिती देवून फसवणूक केल्याबाबत

**(५०) * २१९६७ ॲड.अनिल परब, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील एका व्यक्तीने न्यु ॲण्ड ओल्ड ए.सी. (एअर कंडीशनर) स्टॉक नावाचा बनावट व्हॉट्स ॲप ग्रुप तयार करून अनेक ए.सी. खरेदी विक्री केल्याची खोटी माहिती ग्रुपवर देवून व खोटे दस्तऐवज तयार करून डीलर रेटने इलेक्ट्रॉनिक उत्पादने उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली विदर्भातील अनेक तरूणांकडून रोख रक्कम घेऊन त्यांची लाखो रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, पोलीस महानिरीक्षक, मुंबई यांच्याकडे अवधूत वाडी पोलीस ठाण्यात सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास तक्रार दाखल केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित व्यक्तीने त्यांच्या महालक्ष्मी रेफ्रिजरेटर ॲण्ड एसी सर्विसेस या फर्मच्या नावाने खामगांव, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यातील अनेक इलेक्ट्रॉनिक दुकानदारांची तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथील अधिकाऱ्याची लाखो रूपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली असून पैसे परत मागितल्यास न वटणारे धनादेश देऊन संबंधित व्यक्तींची पुन्हा आर्थिक फसवणूक व मानसिक छळ केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने फसवणूक करणाऱ्या संबंधिताविरूध्द कारवाई करण्याबाबत तसेच फसवणूक झालेल्यांचे पैसे परत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) प्रो. प्रा. श्री महालक्ष्मी रेफ्रिजरेटर सर्विसेस या दुकानाच्या मालकाने रुपये १४,७००/- इतक्या रकमेची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्याकडे दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी तक्रार दाखल केलेली आहे. तसेच, तक्रारदार यांनी मा.उप मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने दिनांक २३/११/२०२३ रोजी पोलीस स्टेशन दिग्रस येथे लेखी तक्रार दिल्यानंतर अवधुतवाडी पोलीस स्टेशन अप.क्र.१३६३/२०२३, भादंवि कलम ४२० अन्वये नोंदविण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

खामगांव, जि.बुलढाणा व वर्धा येथे अशा प्रकारची आर्थिक फसवणूक केल्याबाबत कोणतीही तक्रार अथवा गुन्ह्याची नोंद नाही.
(३) प्रस्तुत प्रकरणाच्या चौकशीमध्ये सदर आरोपीविरुध्द यापूर्वी अवधूतवाडी पोलीस स्टेशन, यवतमाळ येथे भारतीय दंड विधानच्या विविध कलमांतर्गत अप.क्र.३६९/२०२२,अप.क्र.३९१/२०२२, अप.क्र.३५९/२०२२ नोंद करण्यात आलेली असून यामध्ये एकूण रुपये ९,०५,०००/- इतक्या रकमेची फसवणूक झाल्याचे पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. सदरहू तिन्ही गुन्ह्यांचा तपास पूर्ण झालेला असून आरोपीविरुध्द पोलिसांकडून मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महावितरणच्या ग्राहकांकडे ११ लक्ष नादुरूस्त वीज मीटर बसविण्यात आल्याबाबत

**(५१) * २१५५३ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वीजपुरवठा करणाऱ्या महावितरणच्या १० लाख ९७ हजार ग्राहकांकडे नादुरुस्त वीज मीटर बसविण्यात आले असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजीच्या महावितरणच्या अहवालामध्ये निदर्शनास आले असून त्यामुळे चुकीच्या रीडिंगनुसार ग्राहकांना वीज देयक भरावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण विभागात सर्वाधिक ३ लक्ष ६४ हजार, छत्रपती संभाजीनगर विभागात ३ लक्ष ५ हजार, नागपूर विभागात २ लक्ष ६६ हजार, पुणे विभागात १ लक्ष ६० हजार नागरिकांकडे नादुरूस्त मीटर बसविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महावितरणच्या अहवालानुसार नागरिकांना नादुरूस्त वीज मीटर बदलून नवीन वीज मीटर बसवून देणेबाबत तसेच नागरिकांनी वापरलेल्या वीजेचे अचुक देयक उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

वीज मीटर उपकरण हे इलेक्ट्रॉनिक उपकरण असून त्यामध्ये विविध कारणांमुळे तसेच ग्राहकांकडून छेडछाड केल्यामुळे बिघाड होतो.

मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे सदर ग्राहकांना त्यांच्या पुर्वीच्या वापरावर आधारित सरासरी वीज देयक देण्यात येते.
(२) हे खरे आहे.
(३) महावितरण कंपनीमार्फत सदोष मीटर जेष्ठता यादीप्रमाणे कालबध्द पध्दतीने बदलविण्यात येत असून, अशी नादुरुस्त वीज मीटर बदलविण्याची प्रक्रिया महावितरणमार्फत निरंतर सुरु असते. त्यानुसार प्रत्येक महिन्यात सदोष मीटर बदलविण्यात येत आहेत. सन २०२२-२३ मध्ये एकूण ६.७० लाख व सन २०२३-२४ मध्ये आजपर्यंत ३.७४ लाख इतके नादुरुस्त मीटर महावितरण कंपनीमार्फत बदलविण्यात आले आहेत.

मा.महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाद्वारे महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम, २०२१ अन्वये ग्राहकाला खुल्या बाजारातून वीज मीटर घेण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

महावितरणमार्फत नवीन वीज जोडणी तसेच जुने व नादुरुस्त मीटर बदलविण्यासाठी नियमितपणे मीटरची खरेदी ई-निविदेच्या माध्यमातून करण्यात येते.

ग्राहकांना वीज देयकाबाबत शंका असल्यास ते महावितरणच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधून अथवा महावितरणच्या ऑनलाईन संपर्क माध्यमाव्दारे (call centers, Mobile app किंवा WSS) आपली तक्रार नोंद करु शकतात. ग्राहकांच्या तक्रारींचे निरसन करुन देयकांमध्ये काही त्रुटी आढळल्यास महावितरण कंपनीमार्फत त्या त्वरीत दुरुस्त करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**नागपूर.** **सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.